




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २१२ * नांदेड * सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# ‘अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाचा डाव हाणून पाडू!’

## नांदेडच्या महामोर्चातून नेत्यांचा इशारा

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्य सरकार अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे ‘अ, ब, क, ड’ असे उपवर्गीकरण करण्याचा प्रयत्न करत आहे. ही प्रक्रिया असंवैधानिक असून, आम्ही ती कोणत्याही परिस्थितीत हाणून पाडू, असा इशारा रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी नांदेडमध्ये काढण्यात आलेल्या भव्य महामोर्चातून दिला.

महात्मा फुले पुतळा, आयटीआय येथून सुरू झालेला हा महामोर्चा शिवाजीनगर मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चात अनुसूचित जातीतील ५९ जातींचा लाखोंचा जनसमुदाय सहभागी झाला होता. सुरक्षेसाठी ३०० स्वयंसेवक आणि ५०० समता सैनिक दलाचे जवान कार्यरत होते.

या महामोर्चाला आनंदराज आंबेडकर, माजी सामाजिक न्यायमंत्री तथा खा. चंद्रकांत हंडोरे, माजी सामाजिक न्यायमंत्री तथा चर्मकार महासंघाचे अध्यक्ष बबनराव घोलप, राष्ट्रीय ढोर समाज संघटनेचे संस्थापक प्रदेश महासचिव परशुराम इंगोले, आंबेडकरी चळवळीचे युवा आयकॉन अमन आंबेडकर, संपादक कुणाल कांबळे यांची विशेष उपस्थिती होती.

### नेत्यांनी काय म्हटले!

**आनंदराज आंबेडकर:** सरकारने मराठा विरुद्ध ओबीसी, धनगर विरुद्ध आदिवासी अशी भांडणे लावली. आता अनुसूचित जातींतही अशीच फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे. केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्रात स्पष्ट केले आहे की, कलम ३४१ आणि ३४२ नुसार राज्य सरकारला आरक्षणात ढवळाढवळ करता येणार नाही, क्रिमीलेअर लावता येणार नाही. तरीही फडणवीस सरकार जाती-जातीत वाद लावण्याचा डाव आखत


(छाया : करणसिंह बैस, नरेंद्र गडप्पा, ज्ञानेश्वर सुनेगावकर)

आहे.

**खा. चंद्रकांत हंडोरे :** १३% आरक्षणाची विभागणी करून ते हळूहळू संपुष्टात आणण्याचा सरकारचा कुटील डाव आहे. **बनराव घोलप:** अनुसूचित जातीतील ५९ गट १३% आरक्षणात गुण्यागोविंदाने आहेत. नोकरभरती, पदोन्नतीचे प्रश्न प्रलंबित असताना न मागितलेले उपवर्गीकरण आमच्यावर का लादत आहात? **परशुराम इंगोले:** कलम ३४१ नुसार दिलेले आरक्षण त्याच स्वरूपात कायम राहावे. उपवर्गीकरणाला आमचा विरोध आहे. आम्हाला या समूहाबाहेर जायचे नाही. **कुणाल कांबळे :** बार्टी फेलोशिपमध्ये ५९ जातींना १०० जागा आणि आर्टीमध्ये एकट्या मातंग समाजाला १०० जागा दिल्या जातात. जर असेच असेल तर बार्टीसाठी ५९०० जागा करण्यात याव्यात.

या मागण्यांचे निवेदन राष्ट्रपती, राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्यात आले.

महामोर्चाच्या यशस्वीतेसाठी भन्ते पय्याबोधी, रमेश सोनाळे, इंजि. अशोक गायकवाड, इंजि. भारतकुमार कानिंदे, प्रा. प्रबुद्ध चित्ते, राहुल प्रधान, डॉ. हर्षवर्धन दवणे, डॉ. दिनेश निखाते, चर्मकार महासंघाचे माधव गायकवाड, स्वप्नील नरबाग, आतीष ढगे यांच्यासह कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### सरकारला सादर केलेल्या मागण्या

◆ राज्य सरकारने अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करू नये. ◆ राज्य सरकारने नेमलेल्या निवृत्त न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल त्वरित फेटाळावा. ◆ अति मागास जातीतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीत वाढ आणि निवासी शाळा उभाराव्यात. ◆ अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ ची कठोर अंमलबजावणी करावी. ◆ खाजगी क्षेत्रात अनुसूचित जातीला आरक्षण लागू करावे. ◆ सरकारी कार्यालयांतील अनुसूचित जातीच्या नोकरभरतीतील बॅकलॉग भरावा.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त

आरक्षण उपवर्गीकरण विरोधात काढण्यात आलेल्या महामोर्चाला मोठ्या प्रमाणात जनसमुदाय



जमणार असल्याने पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. विशेष म्हणजे मोर्चामध्ये स्वतः अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, श्याम पानेगावकर यांच्यासह पोलीस निरीक्षक संतोष तांबे, राजेश पुरी, अजित कुंभार, वाहतूक शाखेचे मारुती मुंडे, एसआयडीचे सुनील शिंदे, आयबीचे सार्थक पाचभाई यासोबत आदी पोलीस अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात आले होते.


**नांदेड –** आदिवासी दिन सर्वत्र उत्साहात साजरा. आदिवासी संस्कृतीचा जागर करत पारंपरिक वेशभूषेच्या देखाव्याने आदिवासी संस्कृतीच्या रंगात रंगले नांदेड. (छाया : करणसिंह बैस, नरेंद्र गडप्पा, नांदेड)

## स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यासाठी लाल किल्ल्यावर १५ ते २० हजार जवान तैनात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर दिल्ली पोलिसांनी रविवारी लाल किल्ल्यावर केलेल्या मनुष्यबळ आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावरील आधारित सुरक्षा व्यवस्थेची सविस्तर माहिती दिली.

दिल्ली पोलीस उत्तर जिल्ह्याचे पोलीस उपआयुक्त राजा बांठिया यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, मनुष्यबळ तैनात करणे आणि तांत्रिक प्रणालीचा वापर करणे, असे सुरक्षेचे नियोजन दोन भागांत विभागले गेले आहे. दिल्ली पोलीस वाहतूक विभाग, उत्तर जिल्हा पथके, स्थानिक पोलीस, पीसीआर, विशेष शाखा, स्पेशल सेल आणि सामान्य सुरक्षा कर्मचाऱ्यांसह विविध यंत्रणांचे १५ ते २० हजार सुरक्षा जवान तैनात केले जातील. तसेच निमलष्करी दलाच्या अनेक कंपन्या, कमांडो, राष्ट्रीय सुरक्षा रक्षकच्या ‘हिट टीम्स’ आणि स्नायपर्स लाल किल्ल्यावर तैनात असतील. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे पथक उपस्थित असेल. याशिवाय,



वॉचटॉवर आणि महत्त्वाच्या ठिकाणी त्वरित प्रतिसाद देणारी पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत.

लाल किल्ला आणि लगतच्या परिसरात हजारपेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

## ममता बॅनर्जींच्या ताफ्यावर हल्ला

**कोलकता (वृत्तसंस्था)** – पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना उत्तर २४ परगणा जिल्ह्यात तीव्र विरोधाचा सामना करावा लागला. एका मृत तृणमूल कार्यकर्त्याच्या कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी जात असताना आंदोलकांनी त्यांच्या ताफ्याला घेरले. या वेळी आंदोलकांनी ‘चोर-चोर’च्या घोषणा देत त्यांच्या गाडीवर चिखल फेकल्याचा आरोप आहे. ही घटना बीजपूर येथे घडली. मृत पक्ष कार्यकर्त्याच्या घरी जात असताना आंदोलकांच्या एका गटाने ममता बॅनर्जी यांच्या वाहनाला घेराव घातला.

माध्यमांशी बोलताना बॅनर्जी म्हणाल्या, माझ्या गाडीवर दगड, शूज आणि चिखल फेकून हल्ला करण्यात आला आहे. हा पूर्णपणे एक कट आहे. मी येथे येत असल्याची पूर्वकल्पना पोलिसांना दिली होती; तरीही पोलिसांनी सुरक्षेच्या आवश्यक त्या कोणत्याच उपाययोजना केल्या नाहीत. सध्या संपूर्ण पश्चिम बंगालवर गुंडांचे राज्य सुरू आहे.

बॅनर्जी या शांतताप्रिय भागात शांतताभंग करण्यासाठी आल्याचा आरोप आंदोलकांनी केला असून, निदर्शनादरम्यान त्यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. हलीसहर पोलिसांच्या कोठडीत असताना प्रकृती बिघडल्याने या तृणमूल कार्यकर्त्याचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे.

## राज्यभरात विश्रांती घेतलेल्या पावसाची पुन्हा तीव्रता वाढणार; कुठेकुठे मान्सून सक्रिय होणार

**मुंबई (प्रतिनिधी)** –महाराष्ट्रात सध्या सर्वच भागांत मुसळधार पावसाची स्थिति नसली तरी पुढील काही दिवसांत पावसाचा जोर पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः १३ ऑगस्टपासून राज्यातील काही भागांमध्ये पावसाची तीव्रता वाढू शकते, अशी माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, आता हवामानात पुन्हा बदल होण्याचे संकेत आहेत.

हवामान विभागाने हवामानासंबंधित एक महत्त्वपूर्ण अंदाज जाहीर केला आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याचा इशारा दिला आहे. तसेच चालू महिन्यात महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर काहीसा कमी झाल्याचे चित्र आहे. मात्र, मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची चिन्हे दिसत असून १३ ऑगस्टपासून राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. कोकण, घाटमाथा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांना याचा अधिक फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढील काही दिवस हवामान विभागाच्या सूचनांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

दरम्यान, मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राने ८ ऑगस्टला जारी केलेल्या पुढील पाच दिवसांच्या अंदाजानुसार उत्तर कोकण आणि दक्षिण कोकण-गोव्यात बहुतांश ठिकाणी पाऊस अपेक्षित आहे. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात विखुरलेल्या ठिकाणी पावसाची शक्यता आहे. ९ ते १२ ऑगस्टदरम्यानही कोकणात पावसाची शक्यता कायम राहणार आहे. कोकण आणि घाट परिसर पावसाच्या दृष्टीने महत्त्वाचा राहणार आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग परिसरात पावसाच्या सरींची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील घाट भागातही पावसाचा जोर वाढू शकतो.

## कोणी हस्तक्षेप करून कुणबी प्रमाणपत्र रद्द केली असतील तर त्यावर यंत्रणा बसवण्याचा विचार

### जरांगेंच्या टीकेनंतर उदय सामंतांची स्पष्टोक्ती


**मुंबई (प्रतिनिधी)** –राज्यात मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन पुन्हा एकदा राजकीय लढाई पाहायला मिळत आहे. उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना जात प्रमाणपत्र रद्द करण्यात येत असल्याच्या मुद्यावरुन लक्ष्य केलं आहे. याच मुद्यावर मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जर कुणी हस्तक्षेप करुन कुणबी प्रमाणपत्र रद्द केली असतील तर त्यावर यंत्रणा बसवण्याचा आमचा विचार आहे. मनोज दादांनी कोणाचे तरी ऐकून आपला गैरसमज करून घेऊ नये असे मत उदय सामंत यांनी व्यक्त केले. तसेच मराठा समाजाला न्याय देताना इतर कोणावर अन्याय होऊ नये याची काळजी आम्ही घेतल्याचेही सामंत म्हणाले.

कुणबी प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रकरणावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर गंभीर आरोप केले होते. बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यास सांगितले असून त्यांची नार्को टेस्ट करावी, अशी मागणी जरांगेंनी केली होती. बावनकुळेंनी कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यास सांगितले. त्यांनी मराठ्यांचे वाटोळे करण्याचे ठरवले आहे. बावनकुळेंची नार्को टेस्ट करा. एवढे अधिकार दिले तर मी तुमचे पंधरा-वीस आमदार पाडीन.



पैशासाठी तुम्ही प्रमाणपत्रे रद्द केली का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. चंद्रशेखर बावनकुळेंच्या सांगण्यावरुन मराठ्यांची प्रमाणपत्र रद्द करत आहेत. बावनकुळे इतके मोठे झाले का? फडणवीसांनी बावनकुळेंना एवढे अधिकार दिले का? फडणवीस तुम्ही उगाच मराठ्यांना अंगावर घेतलं, अशी देखील टीका त्यांनी केली होती.

देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना कितीही वळवळ करू द्या, त्यांचा माज मोडल्याशिवाय गप्प बसणार नाही असा हल्लाबोल मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी सोलापुरातल्या वैराग गावात बोलताना केला. तुम्ही चुकीचं पाऊल उचललं आहे. मी एकनाथ शिंदे साहेबांना प्रचंड मानणारा माणूस आहे. त्या माणसानं मराठ्यांच्या नोंदी शोधल्या, समिती गठित केली, आणि ५८ लाख नोंदी शोधाव्या लागल्या. यामध्ये उदय सामंत आणि शंभूराज देसाई यांना मरमर करावी लागली. ज्या शिंदे साहेबांनी मराठ्यांना ५८ लाख नोंदी दिल्या, त्याच्यांच शिरसाट या मंत्र्यानं शिंदे साहेबाच्या आदेशानं नोंदी रद्द करायचा घाट घातला, असा आरोप मनोज जरांगे यांनी केला.



## बारामतीमध्ये सात महिन्यांत तिसरा विमान अपघात, प्रशिक्षण विमानानं धावपट्टी सोडली

**बारामती (प्रतिनिधी)** –पुणे जिल्ह्यातील बारामतीत यंदाच्या वर्षातला तिसरा विमान अपघात झाला आहे. ताजी घटना म्हणजेच रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी घडली. दुपारी १२:३५ च्या सुमारास विमानतळ परिसरात, धावपट्टीपासून थोड्या अंतरावर अपघात झाला. बारामती विमानतळावर प्रशिक्षण सुरू असताना विमान धावपट्टीवरून घसरले. हे विमान थेट धावपट्टीजवळच असलेल्या गवताळ भागात गेले. या अपघातात जीवितहानी झालेली नाही. कॅप्टन चिराग शशिकांत डोईफोडे आणि कॅडेट अभिजीत जुंद्रे हे दोघे सुरक्षित आहेत.

विमान सुरुवातीला लिंक ब्राव्होमधून धावपट्टीवर आले, रनवे २९ च्या थ्रेशोल्डवर सरळ रेषेत आले आणि उड्डाण आयत्यावेळी



रद्द झाले. नंतर, विमान रनवे ११ च्या थ्रेशोल्डवर सरळ रेषेत आले, जिथे पुन्हा एकदा उड्डाण रद्द करण्यात आले. या प्रक्रियेदरम्यान, विमान धावपट्टीवर पूर्णपणे थांबवता आले नाही आणि ते रनवे २९ च्या थ्रेशोल्डच्या पुढे गेले. त्यानंतर, रनवे २९ च्या थ्रेशोल्डच्या पलीकडे, ते वाढवलेल्या पक्क्या पृष्ठभागावरून उजव्या बाजूला गवताळ भागात गेले आणि घसरले.

याआधी १३ मे २०२६ रोजी एका खासगी कंपनीचे प्रशिक्षण विमान विमानतळाच्या धावपट्टीजवळ असलेल्या गोजुबावी गावाच्या परिसरात कोसळले. या अपघातात जीवितहानी झाली नाही. मे महिन्यातील अपघाताआधी जानेवारी महिन्यात झालेल्या अपघातामुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळाला मोठा धक्का बसला होता. याच वर्षी (२०२६) २८ जानेवारी रोजी लिअरजेट ४५ हे विमान कोसळून राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांचे निधन झाले होते. या अपघातात अजित पवारांचा एक सुरक्षा अधिकारी तसेच एक हवाई सुंदरी, मुख्य वैमानिक सुमित कपूर आणि फर्स्ट ऑफिसर शांभवी पाठक यांचाही मृत्यू झाला होता.

अजित पवारांचा विमान अपघातात मृत्यू झाला, त्या घटनेला सात महिने होण्याआधीच बारामतीत आणखी दोन विमान अपघात झाले आहेत. मे महिन्यात एक आणि ऑगस्ट महिन्यात आणखी एक अपघात झाला.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# ...म्हणूनच, शेती नुकसानीचाच व्यवसाय!

भारतीय शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सर्वसामान्यांचे जनजीवन हे आजही मान्सूनवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. त्यामुळे पावसाचा प्रत्येक अंदाज हा केवळ हवामानाचा विषय राहत नाही, तर तो अर्थकारण, अन्नसुरक्षा आणि विकासाशी जोडला जातो. यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसाबाबत सुरुवातीपासूनच चिंता व्यक्त केली जात होती. मात्र, आता हिंद महासागरात सक्रिय होत असलेल्या पॉझिटिव्ह इंडियन ओशन डायपोल (आयओडी)मुळे मान्सूनच्या उत्तरार्धात समाधानकारक पावसाची आशा निर्माण झाली आहे. ही नक्कीच दिलासादायक बाब असली, तरी केवळ हवामानातील एका अनुकूल घटकावर विसंबून राहणे योग्य ठरणार नाही. यंदाच्या मान्सूनचा प्रवास चढ-उतारांचा राहिला आहे. जूनमध्ये पावसाची तूट जाणवली. जुलैच्या सुरुवातीला जोरदार पाऊस झाला, पण त्यानंतर पुन्हा खंड पडला. महिन्याच्या उत्तरार्धात मान्सून सक्रिय झाल्याने विशेषतः मराठवाड्यासह अनेक भागांतील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. तरीही राज्यातील पावसाचे वितरण अत्यंत असमान राहिले. काही भागांत अतिवृष्टी झाली, तर काही भाग अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. ही परिस्थिती हवामानातील वाढत्या अनिश्चिततेची जाणीव करून देते. एल निनो हा प्रशांत महासागराशी संबंधित हवामानातील बदल असून त्याचा भारतातील मान्सूनवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते. दुसरीकडे, पॉझिटिव्ह आयओडी हा हिंद महासागरातील तापमानातील फरकामुळे निर्माण होणारा घटक असून तो भारतात चांगल्या पावसासाठी अनुकूल मानला जातो. यंदा हा आयओडी सक्रिय होत असल्याचे संकेत हवामानतज्ज्ञांनी दिले आहेत. विशेषतः २० ऑगस्टनंतर त्याचा प्रभाव अधिक स्पष्ट होऊ शकतो, असे मत व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, हवामानशास्त्रात कोणतीही गोष्ट शंभर टक्के निश्चित नसते. आयओडी सक्रिय झाला म्हणून सर्वत्र मुसळधार पाऊस पडेल, असा निष्कर्ष काढता येणार नाही. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे पट्टे निर्माण होणे, वातावरणातील इतर चक्रीय बदल आणि स्थानिक हवामान प्रणाली यांचाही परिणाम मान्सूनवर होतो. त्यामुळे आशा ठेवतानाच वास्तवाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. हवामानातील या बदलांचा सर्वाधिक परिणाम शेतकऱ्यांवर होतो. पेरणीनंतर पाऊस लांबल्यास पिके करपतात, तर अचानक अतिवृष्टी झाल्यास उभी पिके वाहून जातात. हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतीचे नियोजन अधिक कठीण होत आहे. त्यामुळे केवळ पावसाच्या अंदाजांवर अवलंबून न राहता जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पीक विविधीकरण आणि हवामानानुसार शेती पद्धती स्वीकारण्यावर भर देणे ही काळाची गरज आहे. हवामान बदलाचे परिणाम आता अधिक स्पष्टपणे दिसू लागले आहेत. पूर्वी पावसाचा कालावधी आणि वितरण तुलनेने नियमित असे; आज मात्र काही दिवसांत महिनाभराचा पाऊस पडतो आणि त्यानंतर दीर्घ खंड पडतो. ही बदलती परिस्थिती शेतीबरोबरच जलव्यवस्थापन, शहरांचे नियोजन आणि आपत्ती व्यवस्थापनासाठीही मोठे आव्हान निर्माण करत आहे. सरकारनेही केवळ पावसाच्या प्रतीक्षेत न राहता दीर्घकालीन उपाययोजनांवर भर दिला पाहिजे. जलसाठे वाढविणे, लघु सिंचन प्रकल्प, नद्यांचे पुनरुज्जीवन, शेततळी आणि पाणी अडविण्याच्या योजनांना गती देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर हवामान अंदाज अधिक अचूक आणि गावपातळीपर्यंत पोहोचतील यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना वेळेवर आणि विश्वासार्ह माहिती मिळाल्यास ते योग्य निर्णय घेऊ शकतात. ऑगस्टच्या उत्तरार्धात आणि सप्टेंबरमध्ये चांगला पाऊस झाला, तर खरीप हंगामाला निश्चितच मोठा आधार मिळेल. धरणांतील पाणीसाठा वाढेल, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटेल आणि रब्बी हंगामासाठीही आशादायक परिस्थिती निर्माण होईल. मात्र, हा पाऊस संतुलित असणे तितकेच महत्त्वाचे आहे. अतिवृष्टी आणि दीर्घ पावसाचा खंड या दोन्ही टोकाच्या परिस्थिती शेती आणि अर्थव्यवस्थेसाठी घातक ठरतात. एल निनोच्या सावटात आयओडी हा आशेचा किरण ठरत असला, तरी निसर्गाचा स्वभाव अजूनही अनिश्चितच आहे. त्यामुळे आशावादासोबत नियोजन, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि जलसंपत्तीचे सुयोग्य व्यवस्थापन यांनाच प्राधान्य द्यावे लागेल. कारण चांगला मान्सून हा केवळ नशिबाचा विषय नसून, त्यातून मिळणाऱ्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे हीच भविष्यातील खरी शाश्वत विकासाची गुरुकिल्ली आहे.

# बायोडिझेल : पर्यायी इंधनातून शाश्वत ऊर्जा भविष्याकडे!



दरवर्षी १० ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय बायोडिझेल दिवस साजरा केला जातो. हा दिवस पर्यावरणपूरक आणि नवीकरणीय इंधन म्हणून बायोडिझेलच्या वापराबाबत जनजागृती करण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. ऊर्जा ही विकासाची जीवनवाहिनी आहे; पण विकासाची ही वाटचाल पर्यावरणाच्या किंमतीवर नको, तर पर्यावरणाच्या साथीने हवी!

आज जगासमोर वाढते प्रदूषण, जीवाश्म इंधनांचा मर्यादित साठा, वाढती ऊर्जा गरज आणि हवामान बदल ही मोठी आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत स्वच्छ, नवीकरणीय आणि पर्यावरणपूरक ऊर्जास्रोतांचा स्वीकार ही काळाची गरज बनली आहे. याच हरित ऊर्जा परिवर्तनाच्या प्रवासात बायोडिझेल हा एक महत्त्वपूर्ण पर्यायी इंधनस्रोत म्हणून पुढे येतो. वनस्पतीजन्य तेल, वापरलेले खाद्यतेल आणि इतर जैविक स्रोतांपासून तयार होणारे बायोडिझेल केवळ इंधनाचा पर्याय नाही, तर ऊर्जा स्वावलंबन, पर्यावरण संवर्धन, ग्रामीण विकास आणि शाश्वत भविष्याची नवी दिशा आहे. कचऱ्यातून ऊर्जा, ऊर्जे तून प्रगती आणि प्रगतीतून शाश्वत भविष्य या संकल्पनेला प्रत्यक्षात आणण्याची क्षमता बायोडिझेलमध्ये आहे. कचऱ्याचे रूपांतर ऊर्जेत आणि ऊर्जेचे रूपांतर शाश्वत विकासात! या संकल्पनेचे उत्तम उदाहरण म्हणजे बायोडिझेल. बायोडिझेल हे वनस्पतीजन्य तेल, वापरलेले खाद्यतेल, प्राणीजन्य चरबी तसेच इतर जैविक स्रोतांपासून तयार केले जाणारे पर्यायी इंधन आहे. हे पारंपरिक पेट्रोलियम-आधारित डिझेलला पर्याय म्हणून वापरता येते.

बायोडिझेलचे वैशिष्ट्य म्हणजे ते नवीकरणीय जैविक संसाधनांपासून तयार होऊ शकते. त्यामुळे जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने ते म हत्त्वाची भूमिका बजावू शकते. योग्य मानके आणि मिश्रणाच्या प्रमाणानुसार बायोडिझेलचा वापर डिझेल इंजिनमध्ये इंधन म्हणून केला जाऊ शकतो. विशेषतः वापरलेल्या खाद्यतेलासारख्या संसाधनांचा पुनर्वापर करून कचऱ्यातून ऊर्जा निर्माण करण्याची संधी मिळते. थोडक्यात, बायोडिझेल म्हणजे केवळ डिझेलचा पर्याय नाही; तर स्वच्छ ऊर्जा, संसाधनांचा पुनर्वापर आणि शाश्वत ऊर्जा भविष्याकडे नेणारे एक महत्त्वाचे पाऊल आहे. आजच्या आधुनिक युगात वाहतूक, शेती आणि उद्योगांसाठी इंधनाची गरज सातत्याने वाढत आहे. मात्र, पेट्रोलियम सारखी जीवाश्म इंधने मर्यादित असून त्यांच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरण प्रदूषण आणि हवामान बदलासारखी गंभीर आव्हाने निर्माण होत आहेत. तसेच इंधनाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करून ऊर्जा स्वावलंबन साधणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर स्वच्छ, नवीकरणीय आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध ऊर्जास्रोतांचा शोध घेणे ही काळाची गरज आहे. बायोडिझेल हा अशाच पर्यायी इंधनांपैकी एक असून तो जैविक संसाधनांचा उपयोग करून शाश्वत ऊर्जा भविष्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकतो.

बायोडिझेल हे वनस्पतीजन्य तेल, वापरलेले खाद्यतेल आणि इतर जैविक स्रोतांपासून तयार होत असल्याने शाश्वत ऊर्जे च्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पर्याय ठरू शकते. याच्या वापरामुळे जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होते आणि उपलब्ध जैविक संसाधनांचा अधिक कार्यक्षम वापर करता येतो. विशेषतः वापरलेल्या खाद्यतेलासारख्या कचरा-स्रोतांचा पुनर्वापर करून त्याचे इंधनात रूपांतर करता येते. त्यामुळे कचऱ्यापासून ऊर्जा आणि ऊर्जे तून शाश्वत विकास या संकल्पनेला चालना मिळते. अशा प्रकारे बायोडिझेल पर्यावरण संवर्धन आणि हरित ऊर्जा भविष्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल ठरते बायोडिझेलच्या वाढत्या वापरामुळे त्यासाठी आवश्यक जैविक कच्च्या मालाची मागणी वाढू शकते. त्यामुळे संबंधित पिके व जैविक संसाधने उपलब्ध करून देणाऱ्या शेतकऱ्यांना नवीन बाजारपेठ आणि उत्पन्नाचा पर्याय मिळू शकतो. तसेच ग्रामीण भागात बायोडिझेल निर्मिती, कच्चा माल संकलन व प्रक्रिया यांसारखे उद्योग विकसित झाल्यास स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होऊ शकतात. अशा प्रकारे बायोडिझेलच्या माध्यमातून शेती, ऊर्जा आणि उद्योग यांचा समन्वय साधून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते. भारतामध्ये उपलब्ध असलेल्या विविध जैविक संसाधनांचा योग्य आणि शाश्वत वापर करून आयातित जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यास बायोडिझेल मदत करू शकते. स्थानिक पातळीवर जैविक कच्च्या मालापासून इंधन निर्मितीला प्रोत्साहन मिळाल्यास ग्रामीण व स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळू शकते. यामुळे देशाची ऊर्जा सुरक्षा मजबूत होऊन आत्मनिर्भरतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकता येईल. अशा प्रकारे बायोडिझेल हे पर्यायी इंधनाबरोबरच भारताच्या ऊर्जा स्वावलंबनाचे प्रभावी साधन ठरू शकते.

बायोडिझेलच्या उत्पादन प्रक्रियेत कच्चा माल संकलन, प्रक्रिया, वाहतूक, साठवणूक आणि वितरण अशा विविध टप्प्यांचा सम वेश असल्याने रोजगाराच्या नवीन संधी निम ण होऊ शकतात. विशेषतः ग्रामीण भागात बायोडिझेलशी संबंधित कृषी-आधारित उद्योग व प्रक्रिया केंद्रे विकसित झाल्यास स्थानिक रोजगाराला चालना मिळू शकते. तसेच लघु व मध्यम उद्योगांना बायोडिझेल उत्पादन, कच्चा माल पुरवठा आणि संबंधित सेवा क्षेत्रात नवीन व्यवसायाच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे बायोडिझेल हे हरित ऊर्जेसोबत रोजगारनिर्मितीचेही प्रभावी माध्यम ठरू शकते. हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाद्य उद्योगातून मोठ्या प्रमाणावर वापरलेले खाद्यतेल निर्माण होते. हे तेल योग्य पद्धतीने संकलित करून बायोडिझेल निर्मितीसाठी कच्चा माल म्हणून वापरता येते. त्यामुळे निरुपयोगी ठरणाऱ्या खाद्यतेलाचे उपयुक्त इंधनात रूपांतर होऊन कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा निर्मिती या दोन्ही उद्दिष्टांना साध्य करता येते. तसेच वापरलेले तेल नाल्यात किंवा जलस्रोतांमध्ये सोडण्याचे प्रमाण कमी झाल्याने जलप्रदूषण रोखण्यासही मदत होऊ शकते. अशा प्रकारे वापरलेल्या खाद्यतेलाचा पुनर्वापर हा कचऱ्यापासून ऊर्जा आणि ऊर्जे तून पर्यावरण संवर्धन या संकल्पनेला प्रत्यक्ष रूप देतो.

बायोडिझेलचा योग्य आणि नियोजनबद्ध वापर पर्यावरण संरक्षण, ऊर्जा सुरक्षा, ग्रामीण विकास आणि रोजगारनिर्मिती यांना एकत्रितपणे चालना देऊ शकतो. मात्र, बायोडिझेल खरोखरच शाश्वत ठरण्यासाठी त्याच्या उत्पादनासाठी वापरला जाणारा कच्चा माल, उत्पादन प्रक्रिया, जमीन-वापर आणि संपूर्ण जीवनचक्रातील पर्यावरणीय परिणाम यांचा विचार करणे आवश्यक आहे. त्याम ुळे केवळ बायोडिझेलचे उत्पादन वाढवणे पुरेसे नसून कच्च्या मालाच्या निर्मितीपासून ते इंधनाच्या अंतिम वापरापर्यंत प्रत्येक टप्प्यावर शाश्वततेचा विचार करणे महत्त्वाचे आहे. अशा सर्वसमावेशक दृष्टिकोनातूनच बायोडिझेल शाश्वत विकासाचा प्रभावी भाग बनू शकते. भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे येथे विविध प्रकारची जैविक संसाधने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. या संसाधनांचा योग्य आणि कार्यक्षम वापर करून जैवऊर्जेच्या माध्यमातून देशाच्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यास हातभार लावता येऊ शकतो. बायोडिझेलच्या विकासामुळे पर्यायी इंधनाचा स्रोत उपलब्ध होण्यासोबतच ग्रामीण अर्थव्यवस्थेला आणि स्थानिक उद्योगांना चालना मिळू शकते. तसेच बायोडिझेलसोबत इथेनॉल, बायोगॅस आणि इतर जैवइंधनांचा विकास केल्यास ऊर्जा क्षेत्रात विविधता निर्माण होऊन जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करता येईल. त्यामुळे ऊर्जा स्वावलंबन, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दिशेने भारताची वाटचाल अधिक मजबूत होऊ शकते.

बायोडिझेलचा प्रभावी आणि शाश्वत विस्तार करण्यासाठी भविष्यात अधिक कार्यक्षम, किफायतशीर आणि पर्यावरणपूरक उत्पादन तंत्रज्ञानाचा विकास करणे आवश्यक आहे. हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाद्य उद्योगातून निर्माण होणाऱ्या वापरलेल्या खाद्यतेलाचे शास्त्रोक्त पद्धतीने संकलन करून त्याचा पुनर्वापर वाढवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर पर्यावरणावर कमी परिणाम करणाऱ्या शाश्वत कच्च्या मालाचा वापर करण्यावर भर दिला पाहिजे. बायोडिझेलच्या क्षेत्रात संशोधन, नवतंत्रज्ञान आणि कौशल्यविकासाला प्रोत्साहन देतानाच समाजामध्ये त्याबाबत जनजागृती करणेही महत्त्वाचे आहे. बायोडिझेलकडे केवळ पर्यायी इंधन म्हणून न पाहता सौरऊर्जा, पवनऊर्जा, बायोगॅस, इथेनॉल आणि इतर नवीकरणीय ऊर्जास्रोतांसोबत व्यापक हरित ऊर्जा व्यवस्थेचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून विकसित करणे ही भविष्यातील योग्य दिशा ठरेल. बायोडिझेल हा केवळ डिझेलचा पर्याय नाही; तो स्वच्छ ऊर्जा, ग्रामीण विकास, ऊर्जा स्वावलंबन आणि शाश्वत भविष्यातील एक महत्त्वाचा दुवा आहे.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

# गुंफण नात्याची

प्रशस्त, देखणे, टुमदार, सर्व सोयीसुविधांनी युक्त घर आहे; पण त्या घराला घरपणच उरलेले नाही. सोन्यासारखी माणसे आहेत. आई, बाबा, भाऊ, बहीण पत्नी, मूलंबाळ सगळी-सगळी नाती आहेत. पण त्या नात्यात ओलावाच उरला नाही. प्रत्येक नात्यात ओलावा असावा, तो तसाच टिकून राहावा यासाठी कुणी प्रयत्नही करत नाही. प्रत्येकाच्या डोक्यात एकच विचार मला काय गरज आहे...? माझ्याकडे सगळं काही आहे; मला कोणाचीही गरज नाही. पण लक्षात घ्या हा भ्रम आहे. निव्वळ भ्रम... हे वेळोवेळी सिद्ध झालंय...कसला पैसा...?... कुणाची धनदौलत...? कुठला मानसन्मान...? कुठली पद, प्रतिष्ठा...? कसली स्थावर-जंगम मालमत्ता...? कशाची प्रसिद्धी...? कुठला बडेजावपणा...? एवढे सगळे मिळाले म्हणजे आयुष्य सुखी आणि समृद्ध झाले असे नाही. किती आणि कुठपर्यंत या सर्वांचा उपयोग...? या सर्वांपेक्षाही आयुष्यात आणखीन काही महत्त्वाचे असते...? भौतिक सुखाने सुख मिळाल्याचा केवळ आभास निर्माण होतो. प्रत्यक्ष समाधान मिळत नाही.

सुख, समाधान, आनंदासाठी आपल्या माणसांचे प्रेम, माया, ममता, आपुलकी, वात्सल्य आणि त्यांचा आनंददायी सहवासच आवश्यक असतो. पैसा, धनदौलत, प्रतिष्ठा मानसन्मान तुम्हाला समजून घेऊ शकत नाही. तुमच्या डोक्यावरून मायेने हात फिरवू शकत नाही. तुम्हाला कुरवाळू शकत नाही. तुम्हाला कुशीत घेऊ शकत नाही. तुमचे दुःख समजून घेऊ शकत नाही. तुमच्या वेदना त्यांना कळत नाहीत. त्यासाठी आपली माणसेच लागतात.

अभिमान वाटावा असं एक तरी नातं हवं.... ज्याच्या खांद्यावर डोकं ठेवलं की अक्षरशः बांध फुटावा.... कुणाजवळ तरी हंबरडा फोडून रडता यावं... कुणाला तरी सगळं सुख-दुःख सांगता यावं....आयुष्यात कोणीतरी हवं त्याचं सगळं ऐकून घ्यावं आणि ज्याला आपलं सगळं काही सांगावं... कोणीतरी हवं ज्याला आपलं असणं हवंहवंस वाटावं. ज्याला आपलं रुसणं नकोसं वाटावं. आपण आनंदातच राहावं. आपल्या आयुष्यात दुःख येऊच नये आणि आलेल्या दुःखाला सामोरे जाण्याचे धैर्य त्यांनी आपल्याला द्यावं. आपल्या असण्याचा ज्याच्यावर फरक पडावा. आपल्या नसण्याने ज्याला विरह वाटावा, अशी हक्काची, जीवाभावाची माणसं आपलं दुःख समजू शकतात. आपल्याला समजू शकतात. या सगळ्या समजून घेण्यामुळेच आपण सुखी, समाधानी, आनंदी राहू शकतो.

कशासाठी जगतो आहोत आम्ही? आणि कुणासाठी जगतो आहोत आम्ही? या दोन प्रश्नांची उत्तरे अगदी मध्यरात्री जरी कोणी विचारली तरी ती सांगता यावीत.. या प्रश्नांची उत्तरे सापडली नाहीत; तर मात्र माणूस नाईलाजाने आत्महत्येकडे वळतो. आजच्या धावपळीच्या एकविसाव्या शतकात माणसाचे जीवन कसे झाले आहे. यावरील एक सुंदर कविता आठवते.



आऊटडेटेड झाले आयुष्य सारं
स्वप्नही डाऊनलोड होत नाही
संवेदनांना व्हायरस लागलाय
दुःख सेंड करता येत नाही
जुने पावसाळे उडून गेलेत
डिलीट झालेल्या फाईल्ससारखे
आणि घर आता शांत असतं
रेंज नसलेल्या मोबाईल सारखे
हँग झालेल्या पीसीसारखी
मातीची स्थिती वाईट
जाती माती जोडणारी
कुठेच नाही वेबसाईट
एकविसाव्या शतकातील
पीढी भलतीच क्युट
कॉन्टॅक्ट लिस्ट वाढत गेली
संवाद झाले म्युट
कम्प्युटरच्या चीपसारखा
माणूस मनानं खुजा झालाय
अन् मदर नावाचा बोर्ड त्याच्या
आयुष्यातून वजा झालाय
फ्लॉपी डिस्क ड्राइव्हमध्ये
आता संस्कारांनाच जागा नाही
फाटली मने सांधणारा
इंटरनेटवर धागा नाही
विज्ञानाच्या युगातील
केवढी मोठी चूक
रक्ताच्या नात्यांनाही लागते
व्हाट्सअप आणि फेसबुक

एका घरात राहत आहोत, पण संवाद विसरत चाललो आहोत. हे केवढे दुर्भाग्य आहे. कुटुंबातील माणसे आहेत; पण कोणत्या न कोणत्या कारणामुळे एकमेकापासून दुरावलेली आहेत. नातेवाईक भरपूर आहेत तरीदेखील अभिमान वाटावा असं एकही नातं नाही. प्रत्येक जण आपापल्या तोऱ्यात, गर्वात, अहंकारात, मीपणात काठोकाठ बुडाला आहे. ढीगभर मित्र आहेत, पण मन मोकळे करावे असा एकही नाही. अंत:करण मोकळे करावे. हृदयात साठलेल्या सगळ्या वेदना दाखवाव्यात. काळजाला टोचणाऱ्या गोष्टी सांगाव्यात. मनाच्या वेदनादायी जखमांवर फुंकर घालावी. खदखदून हसावे. रडून एकदाच मोकळे व्हावे, असा एकही कुटुंबातील सदस्य, एकही नातेवाईक आणि एकही मित्र नसणे. म्हणजे आपल्या जीवनाचं सर्वात मोठे अपयश आहे.

सांगू कशी कुणाला
कळ आतल्या जीवाची
चिरदाह वेदनेचा
मज शाप हाच आहे

**-मयूर जोशी**
विठ्ठल-रुक्मिणी नगर, जिंतूर.
मो. ९७६७७३३५६०
७९७२३४४१२८

# 'मोहा'मुळे मनुष्य अधोगतीच्या दिशेने...!

अलेक्झांडर सिकंदरला संपूर्ण जग जिंकण्याचा मोह झाला,आणि त्या 'मोहा' मध्ये तो पुढे पुढे गेला,आणि बॅबिलोन येथेच मरण पावला, घरी तो परत आला नाही, म्हणून मोहाच्या चक्रव्यूहात कोणीही पडू नये.मोहामुळे सत्ता, संपत्ती जमीन-जुमला, पद, प्रतिष्ठा हे सर्व हातून निसटून जाते,लोकप्रतिनिधी निवडणूकीत अनेक वेळा विजयी होऊन सुध्दा अतृप्त असतात,खुर्चीचा मोह कमी होत नाही,म्हणूनच म्हटले जाते. मोहाला पूर्णविराम नसतो. प्रत्येक मनुष्य 'मोहा' मध्ये अडकतो असे नाही, परंतु त्यामध्ये अडकणा-याची संख्या ही कमी नाही, दुर्योधनाला संपत्तीचा अतिशय गर्व होता, आपल्या चुलत भावांना सुईच्या टोकावर बसेल एवढी माती सुद्धा मी देणार नाही, असे त्यांनी दरबारात सर्वांसमक्ष ठणकावून सांगितले, त्यामुळे कुरुक्षेत्रावर जे अठरा दिवस महाभयंकर युद्ध झाले, त्या युद्धात शंभर कौरव मारले गेले, हे मोहा'चे झणझणीत डोळ्यात अंजन घालणारे महाभारतातील उदाहरण आहे. त्यामुळे मोहापासून दूर राहावे .आपल्या येथे शेती, धनदौलत, नोकर-चाकर, डामडौला असावा,असे अनेकांना वाटते. त्यामुळे त्यांना संपत्ती कमावण्याचा लोभ होतो, आणि तो वाढत जातो, त्यामुळे तो आपला विवेक गमावतो आणि स्वतःला विसरून जाऊन मोहाच्या जाळ्यात अडकतो, एक बार मोह झाला की तो सुटता सुटत नाही. अनेक महिला सोन्याच्या दागिन्यांच्या मोहात पडतात, सोनं वाढवत जातात आणि एखाद्या दिवशी चोराला ही माहिती कळाली की बदाबदा मार खातात, हे वास्तविकता आहे. औरंगजेब दक्षिणेत स्वारी करण्यासाठी आला त्यांनी हा संपूर्ण प्रदेश आपण जिंकून घ्यावा असा त्याला मोह झाला; आणि तो येथेच अनंतात विलीन झाला, असे अनेक उदाहरणे आपल्याला सांगता येतात.मोहामुळे चांगले चांगले व्यक्ती रसातळाला गेलेले आहेत, म्हणून जास्त मोह करणे चांगले नाही. स्वतः आपण काळाचे, वयाचे बंधन ठेवून वागावे आणि त्यावर नियंत्रण ठेवावे. जर आपले नियंत्रण कमी झाले तर आपण त्यातून बर्बाद होतो.आपल्या बाजूचा शेजारी असलेला फ्लॅट घ्यावा असा काही जणांना लोभ होतो, आणि मग येनकेन प्रकारे तो मि ळवण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळेस माणसाची सदसद्विवेकबुद्धी भ्रमिष्ट होते. म्हणून मोह ही चांगली गोष्ट नाही.काही जण स्त्रीच्या मोहात पडतात. सर्वस्व तिला अर्पण करून तूच माझी रंभा, मेनका, अप्सरा असे संबोधतात आणि शेवटी हताश होतात ही मोहिनी आपल्याला बर्बाद करूनच थांबते हे त्यांना लवकर कळत नाही.काही सुख हे फक्त क्षणिक असते परंतु ते संपूर्ण आयुष्य वाटोळे करून जाते,म्हणून बऱ्याच जणांना पैसा कमवण्याचा मोह होतो, मग ते शेअर्स मार्केटमध्ये पैसे गुंतवतात, इतके लाख तितके लाख म्हणून रात्रभर बेरीज गुणाकार करतात, आणि बरोबर त्यामध्ये अडकतात.म्हणून मोहाला आवर घालता येते. परंतु बऱ्याच जणांना ती जमत नाही, थोडी थोडी पिता पिता माणूस व्यसनाधीन होतो आणि जीवनाच्या वाईट वळनाकडे वळतो म्हणून माणसाने मोह टाळावा. अनेक



जुगारी जास्त पैसा मिळवण्याच्या नादात जुगार खेळतात त्या मोहा मध्ये आपली बुद्धी गहाण टाकतात,

बऱ्याच जणांना सहलीला गेल्यावर समुद्राच्या जास्त पाण्यात जाण्याचा मोह होतो आणि तो तिकडेच जातो. मोठमोठ्या गाड्या घेऊन चालवणे, सहा महिन्याला किंवा वर्षाला गाडी बदलने, त्यामुळे गाड्यांचा मोह होऊन मनुष्य आर्थिक दृष्ट्या दुर्बल बनतो , तुमचे आम्ही नोकरीचे काम करून देऊ म्हणून काही जण लाखो रुपये उकळतात. त्यांचा त्यांना मोह होतो आणि एके दिवशी लाचलुचपत खात्याच्या बरोबर जाळ्यात सापडतो.या मोहामुळे अनेक मनुष्य अधोगतीच्या दिशेने जातात, काही जण आता सुद्धा वाटचाल करीत आहेत. एका म्हातारीला परमेश्वराने विचारले?

तुला काय हवे? त्यावेळेस ती म्हणाली मला हिरे हवे आहेत त्यावेळेस परमेश्वराने तिला मी या पोत्यात हिरे देतो, परंतु ते पोतं तू जमिनीला टेकू देऊ नकोस? तुला वजन झेपे पर्यंत हिरे मी पोत्यात टाकतो ,त्यावेळेस तू बस्स झाले असं म्हणायचं. नसता जमिनीला पोतं टेकल्यास त्याची माती होणार असे सांगितले. म्हातारीला जास्त हि-याची हाव सुटली आणि आणखी हिरे टाका? आणखी हिरे टाका ?असे म्हणून जास्त हिरे मागून घेण्याच्या नादात हिऱ्याचे वजन तिला झेपले नाही, सरळ हिऱ्याने भरलेलं पोतं जमिनीला टेकले आणि या मोहात पोतं गेले आणि हिरे ही गेले, या गोष्टीचा तात्पर्य म्हणजे जास्त मोहामुळे सर्व सत्यानाश झाला, आलेली संधी ही निघून गेली, त्यासाठी मोहाच्या नादी लागू नका, सध्या सेल्फी काढण्याच्या नादात सध्या तरुण मुले मुली व आबालवृद्ध गुंतलेली आहेत, अवघड ठिकाणी जाऊन सेल्फीच्या मोहात सरळ दरीमध्ये कोसळत आहेत.

हे अमूल्य जीवन अशा पद्धतीने संपून टाकत आहेत ही लाजिरवाणी गोष्ट आहे. जास्त पगाराच्या नोकरीची अपेक्षा अनेक तरुण सध्या करीत असून छोटी नोकरी सुद्धा सोडून देत आहेत,आणि त्यानंतर पश्चाताप करण्याची वेळ आली आहे. म्हणून जे सुरुवातीला आलं तेच स्वीकारावे व नंतर आपलं शिक्षण वाढवावे असे माझे वैयक्तिक मत आहे. मोह, माया, ममता, अति लोभ या गोष्टीमुळे अनेक तरुण इतरांच्या जाळ्यात पडत आहेत. आणि आपली असलेली ही प्रतिष्ठा गमावून बसत आहेत, इतिहासामध्ये धनानंद राजा अतिशय धनाचा लोभी होता त्यामुळे त्याचे राज्य लयाला गेले हे सर्व वास्तविक आहे. एका व्यक्तीला सोन्याच्या ९९ मोहरा सापडल्या होत्या त्याम ुळे आणखी एक सापडेल या नादात तो रात्रभर शोध घेत होता कारण त्याला त्या शंभर हव्या होत्या याच मोहापाई सकाळी त्याला चक्कर आली आणि तो गतप्राण झाला.

.सांगण्याचा उद्देश हा आहे की तुम्ही जेवढे सापडले,तेवढ्या मध्ये समाधानी राहायचा प्रयत्न करा. मोहामुळे तेल ही जाते आणि तूप ही जाते, आणि हाती धुपाटणे तेवढंच शिल्लक राहते. मोहाचा आणि काही व्यक्तींचा अतिशय जवळचा संबंध आहे. पटकन चांगली व्यक्ती ,वस्तू , इमारत , बाग, चांगला दिसला की मनुष्य मोहात पडून बळकावण्याचा प्रयत्न करतो, आणि येथेच तो हरतो म्हणून मोहाच्या जाळ्यात पडू नका. स्त्री सुद्धा पुरुषाच्या मोहात पडते, शूर्पणखा ही लक्ष्मणाच्या मोहात पडून त्यांना फसवण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु ही गोष्ट श्रीराम प्रभूला कळाली आणि त्यांनी शूर्पणखाचे नाक कापले असे रामायणामध्ये दाखले आहेत. म्हणून मोह होऊ देऊ नका. मानवी जीवन नि:स्वार्थ भावनेने, निर्मळ, स्वच्छ मनाने चारित्र्यवान जगावे ,नाहीतर मोहाचा कलंक लागून आपले जीवन अर्ध्यावर मोडू नये ही अपेक्षा व्यक्त करतो.

**- प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष : विठूमाऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता. मुखेड, जि. नांदेड

# कर्जमुक्ती योजनेचा पहिला टप्पा पूर्ण; नांदेड जिल्ह्यातील १२ हजार ९२९ शेतकऱ्यांना १०६.२५ कोटींचा दिलासा

**नांदेड (प्रतिनिधी)**– पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–२०२६ अंतर्गत राज्यातील पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रक्रियेला वेग आला असून, पहिल्या टप्प्यात नांदेड जिल्ह्यातील १२ हजार ९२९ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांसाठी १०६ कोटी २४ लाख ९८ हजार २३१ रुपये संबंधित बँकांकडे वर्ग करण्यात आले आहेत. ही रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा करून त्यांना कर्ज बेबाकी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.



राज्य मंत्रिमंडळाने २ जून २०२६ रोजी या योजनेला मंजुरी दिली होती. त्यानंतर शासन निर्णयाद्वारे योजना लागू करण्यात आली असून १५ जुलै २०२६ रोजी काही निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील ३० जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, १२ राष्ट्रीयीकृत बँका आणि इतर खासगी बँकांसह एकूण ५३ बँकांनी शेतकऱ्यांच्या सुमारे ३२ लाख कर्जखात्यांचा डेटा महाआयटीच्या पोर्टलवर अपलोड केला आहे.

सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्या माहितीनुसार, निकषांनुसार पात्र ठरलेल्या सुमारे १६.९६ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी २५ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. त्यापैकी ६ ऑगस्टअखेर १२.१० लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे. योजनेसाठी शासनाने २२ जुलै रोजी १ कोटी रुपये आणि ३० जुलै २०२६ रोजी ७ हजार कोटी रुपयांचा निधी सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्याकडे उपलब्ध करून दिला आहे. ७ ऑगस्ट २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या सुमारे ६.२२ लाख पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५ हजार २८ कोटी रुपये ऑनलाइन पद्धतीने थेट हस्तांतरित करण्यात आले.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत ६१ हजार शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून ३५ हजार ८०६ शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण अद्याप बाकी आहे. पहिल्या यादीतील उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी तातडीने ॲग्रीस्टॅक नोंदणी व आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच, कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी तातडीने पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश शासनाने सर्व बँकांना दिले आहेत. उर्वरित पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यांमध्येही लाभाची रक्कम जमा करण्यात येणार आहे.

# अण्णा भाऊ साठे जागतिक कीर्तीचे महान मानवतावादी लेखक - डॉ. गायकवाड

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान



**नांदेड (प्रतिनिधी)** – कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि श्रमिकांच्या रक्त, अश्रू व घामाची महती आपल्या लेखणीतून मांडणारे लोकलेखक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे जागतिक कीर्तीचे महान मानवतावादी लेखक होते, असे प्रतिपादन पुरोगामी विचारवंत डॉ. शरद गायकवाड यांनी केले.

अण्णाभाऊ साठे यांच्या १२६ व्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्ययन व अभ्यास केंद्र, विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने अधिसभा सभागृहात आयोजित 'अण्णा भाऊ साठे लेखन प्रेरणा दिन' व जयंती कार्यक्रमात डॉ. गायकवाड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन होते.

डॉ. शरद गायकवाड म्हणाले की, अवघ्या दीड दिवसांच्या अत्यल्प औपचारिक शिक्षणाच्या बळावर नव्हे, तर प्रत्यक्ष जीवनातील अनुभव, संघर्ष, वेदना आणि सामाजिक वास्तव यांना गाठीशी बांधून अण्णाभाऊंनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर साहित्यनिर्मिती केली. चळवळीतील २७ वर्षांच्या कालखंडात त्यांनी तब्बल ७७ ग्रंथांची निर्मिती केली. त्यांच्या साहित्याचे जगभरातील २० हून अधिक भाषांमध्ये भाषांतर झाले असून, त्यांच्या साहित्याचा अभ्यास आजही जगभर सुरू आहे. अण्णाभाऊंनी सर्वसामान्य माणसाला साहित्याचा नायक बनविले. साहित्यनिर्मिती ही केवळ मनोरंजनासाठी नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, हे नवे मूल्य त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून मांडले. त्यांनी मराठी साहित्याचा केंद्रबिंदूच बदलून टाकला. त्यांच्या साहित्यामध्ये सत्यशोधकी, मार्क्सवादी, आंबेडकरी, स्त्रीवादी आणि साम्राज्यवादविरोधी विचारांचा अपूर्व संगम आढळतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वर्गव्यवस्था आणि जातिव्यवस्था बदलली पाहिजे, हा परिवर्तनवादी विचार अण्णाभाऊंनी आपल्या लेखणीतून मांडला. त्यांचा जीवनप्रवास हा संघर्षाचा होता. 'एक पाय तुरुंगात आणि एक पाय चळवळीत' असे त्यांचे जीवन होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी त्यांनी पोवाड्यांच्या माध्यमातून जनजागृती केली आणि संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठीही अण्णाभाऊंनी संघर्ष केला. तत्कालीन काळात तमाशावर बंदी घालण्यात आली असताना त्यांनी तमाशाला 'लोकनाट्य' हे नवे स्वरूप देत या साहित्यप्रकाराला सामाजिक आशय आणि परिवर्तनवादी दिशा दिली. त्यांच्या साहित्याने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि सामाजिक परिवर्तनाची मशाल तेवत ठेवली. मानवतेच्या व्यापक दृष्टिकोनातून निर्माण झालेले अण्णाभाऊंचे साहित्य हे ज्ञानपीठाच्या तोलाचे आणि भारतरत्नाच्या मोलाचे कार्य आहे, असे ठाम प्रतिपादन डॉ. शरद गायकवाड यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी अण्णाभाऊंच्या जीवनातील विविध अनुभवांचा संदर्भ देत, अण्णाभाऊंनी कष्टकरी आणि सामान्य माणसाचा चेहरा आपल्या साहित्यातून प्रभावीपणे मांडला. समाजातील वास्तवाचे दर्शन घडवून ते जगासमोर सत्य मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनीता पाटील यांनी केले, तर आभार डॉ. राजपालसिंह चिखलीकर यांनी मानले. कार्यक्रमाचे मुख्य संयोजक डॉ. मारुती गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. यावेळी डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. प्रमोद लोणारकर, डॉ. वैजनाथ अनमुलवाड, डॉ. बाबुराव जाधव यांच्यासह संशोधक विद्यार्थी, विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते काकांडी येथे गरजू रुग्णांना औषधींचे वाटप

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने माजी सरपंच सुदीन बागल यांच्या वतीने काकांडी गावातील ग्रामस्थांसाठी आरोग्य शिबीर व अंतर्गत गरजू रुग्णांना आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते ७ जुलै रोजी मोफत गोळ्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मूलभूत सुविधा अंतर्गत दहा लक्ष रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले.



नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम माजी सरपंच सुदीन बागल व मित्र मंडळ यांच्यावतीने राबविण्यात आले. तसेच. आ. बोंढारकर यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शिवसेना जिल्हा प्रमुख विनय गिरडे पाटील, तालुका प्रमुख उद्धव पाटील शिंदे, नांदेड दक्षिण शहर प्रमुख तुलजेश यादव, तुप्पा प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी सर्व डॉक्टर, कर्मचारी, आशा वर्कर्स यांनी आरोग्य शिबीर यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

आ. आनंदराव पाटील बोंढाकर यांच्या वाढदिवस सोहळ्याला काकांडी येथील सर्व शिवसैनिक, प्रतिष्ठित नागरिक व मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सुरज तेलंगे यांची महाराष्ट्र सुरक्षा बलात निवड

**लोहा (प्रतिनिधी)** – बोरगाव (आ.) येथील युवा सामाजिक कार्यकर्ते सुरज गोविंदराव तेलंगे यांची महाराष्ट्र सुरक्षा बलमध्ये निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे गावातील नागरिकांसह परिसरात अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.



अत्यंत प्रतिकूल परिस्थिती, अनेक अडचणी आणि सततच्या संघर्षाचा सामना करत सुरज तेलंगे यांनी जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. अनेक वेळा परिस्थितीने त्यांची परीक्षा घेतली; मात्र त्यांनी कधीही हार मानली नाही. संघर्ष हा यशाचा पाया असतो हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले.

समाजसेवेची आवड जपत त्यांनी युवकांना शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देण्याचे कार्य सातत्याने केले तर यश निश्चित मिळते, असे सुरज तेलंगे यांनी सत्काराला उत्तर देताना म्हटले.

सुरज तेलंगे यांच्या या यशाबद्दल गावातील ग्रामस्थ, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत असून, पुढील सेवाकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. यश हे एका दिवसात मिळत नाही; त्यामागे अनेक दिवसांचा संघर्ष, अथक परिश्रम आणि स्वतःवरील अढळ विश्वास असतो. सुरज गोविंदराव तेलंगे यांचा प्रवास हा आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी आदर्श आहे, असे उपस्थित मान्यवरांनी प्रतिक्रिया नोंदवताना सांगितले.

# नांदेड विभागातील तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची प्रवासी सेवेत उल्लेखनीय कामगिरी

## हरवलेल्या वस्तू परत, गुन्हे उघड, अल्पवयीन मुलांना सुरक्षित मदत

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी जानेवारी ते जुलै २०२६ या कालावधीत प्रवासी सुरक्षा, हरवलेल्या वस्तूंची परतफेड आणि गरजू प्रवाशांना मदत करून कर्तव्यनिष्ठेचे उदाहरण सादर केले.



२४ जानेवारी रोजी नांदेडचे सीसीटीसी धीरज गायकवाड यांनी रायचूर–परभणी एक्स्प्रेसमधील हरवलेली बॅग शोधून प्रवाशाला परत केली. २९ एप्रिल रोजी नांदेडचे टीटीआय कैलास सदरे यांनी देवगिरी एक्स्प्रेसमध्ये मोबाईल चोरी करणाऱ्या दोन संशयितांना पकडून एक मोबाईल जप्त केला. दोघांना आरपीएफकडे सोपवण्यात आले.

१४ जून रोजी राधेश्याम मीना, सीटीआय/नांदेड यांनी वंदे भारत एक्स्प्रेसमधील ३० हजार रोख असलेली बॅग सुरक्षितपणे प्रवाशाला परत केली. ९ जुलै रोजी नांदेडचे सीसीटीसी पियुष वाजपेयी यांनी पनवेल–नांदेड एक्स्प्रेसमधील ९ ते १२ वयोगटातील तीन अल्पवयीन मुलांना शोधून त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले. २५ जुलै रोजी नांदेडचे टीटीआय एस. डी. राणे यांनी नंदीग्राम एक्स्प्रेसमधील बॅग व मोबाईल प्रवाशाला परत केला. नांदेड विभागातील तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांची सतर्कता, प्रामाणिकपणा आणि संवेदनशीलता यामुळे प्रवाशांना तत्काळ मदत मिळाली असून, रेल्वे प्रशासनाने कौतुक केले आहे.

# वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंतांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– शिवा अखिल भारतीय वीरशैव बहुजन कर्मचारी महासंघ, नांदेड जिल्ह्याच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंतांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी कुसुम सभागृह, नांदेड येथे आयोजित समारंभात शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व क्रीडापटूंचा सत्कार समारंभ पार पडणार आहे.

शिवा अखिल भारतीय वीरशैव बहुजन कर्मचारी महासंघामार्फत प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही भव्य कार्यक्रमात गुणवंतांना गौरविण्यात येणार आहे. यात इयत्ता ४ थी, ५ वी, ७ वी, ८ वी शिष्यवृत्ती गुणवत्तायादीतील विद्यार्थी, नवोदय विद्यालय प्रवेश, सैनिक विद्यालय, इयत्ता १० वीत ८०% पेक्षा अधिक व इ. १२ वीत ७५% पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी, आयआयटी, एनआयआयटी प्रवेश व सीईटी ९८% पेक्षा अधिक गुण, नीट परीक्षा ४७५ पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी, यूपीएससी, एमपीएससी, सीए, नेट–सेट उत्तीर्ण विद्यार्थी, पीएच.डी. धारक विद्यार्थी, नीट पीजी निवड विद्यार्थी, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील क्रीडापटू तसेच शासकीय सेवा प्रवेश आणि सेवानिवृत्त कर्मचारी यांचाही सन्मान करण्यात येणार आहे.

# टायरबोर्ड कमान परिसरात अघोरी प्रथा आणि हुंड्यासाठी छळ

## ९ आरोपींवर बीएनएस व अंनिस कायद्यान्वये गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुलगा होत नाही म्हणून शारीरिक–मानसिक त्रास, माहेरून ५ लाख रुपये आणण्याचा तगादा आणि मुलीचा 'नरबळी' देण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. या प्रकरणी ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील फिर्यादी उम्मे ऐमन मोहमद वसीम अकरम (वय २८ वर्षे, रा. टायरबोर्ड कमान, देगलूर नाका, नांदेड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १३ मार्च २०१८ ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत त्यांना सासरच्या मंडळींकडून सतत छळ करण्यात आला. आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला तुला मुलगा होत नाही, मुलीच होतात. कंपनी टाकण्यासाठी माहेरहून ५ लाख रुपये घेऊन ये, असे म्हणून सतत मारहाण केली. यावरच न थांबता आरोपींनी गुप्तधन काढण्यासाठी तुझी मुलगी हिचा नरबळी देऊ अशी अघोरी धमकी दिली. फिर्यादीने विरोध केला असता त्यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोहम्मद वसीम अकरम अब्दुल वाहिद, आफरीन बेगम इम्रान मोमीन, मोहम्मद इम्रान दोघे रा. मालटेकडी, नांदेड, बिबी तबस्सुम शाहेद जहागीरदार, शाहेद जहागीरदार दोघे रा. हातई, नांदेड, अब्दुल वासे अब्दुल वाहिद, रखीब अब्दुल वाहिद दोघे रा. कुंभार टेकडी, नांदेड, गौस बाबा, रा. वसमत आणि हाफेज जब्बार, रा. अकोला यांचा आरोपींमध्ये समावेश आहे.

फिर्यादीच्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे गु.र.नं. ९४८/२०२६ दाखल करण्यात आला आहे. त्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ८५, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३), ३(५) तसेच महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध अधिनियम २०१३ चे कलम ३(२), ३(३) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अशा प्रकारच्या अघोरी प्रथा, जादूटोणा किंवा हुंड्यासाठी छळ होत असल्यास तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नांदेड ग्रामीण पोलीस प्रशासनाने केले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कानगुले करीत आहेत.

# 'मंडल आयोग' विजय दिवस साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)**– मंडल आयोग विजयी दिनाचे स्मरण म्हणून नांदेड येथील ओबीसी बुद्धिजीवींच्या वतीने मंडल आयोग विजय दिवस साजरा करण्यात आला.

आयटीआय चौकातील महात्मा फुले स्मारकाजवळ झालेल्या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बी. पी. मंडल आणि विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

देशातील साडेतीन हजारांहून अधिक जातींमध्ये विभागल्या गेलेल्या आणि वर्षानुवर्षे न्याय, हक्क व अधिकारांपासून वंचित राहिलेल्या ओबीसी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी ७ ऑगस्ट १९९० रोजी मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची ऐतिहासिक घोषणा केली होती. त्यामुळे शिक्षण, नोकऱ्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना राजकीय आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

# सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल माने यांचा सत्कार; माजी सैनिकांच्या समस्या सोडवण्याचे आश्वासन

## नांदेडमध्ये सैनिक संकुल उभारणार; १० एकर जमिनीची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल राहुल माने यांच्यासोबत नुकतीच बैठक पार पडली. सैनिक कल्याण अधिकारी म्हणून रुजू झालेले लेफ्टनंट कर्नल माने यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.



बैठकीत नवीन अधिकाऱ्यांनी माजी सैनिकांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी आश्वासन दिले की, मी येथे कायमस्वरूपी असल्याने कल्याणकारी योजनांचे वाटप तातडीने केले जाईल. जिल्ह्याचा ध्वज निधीचा इष्टांक १०० टक्के पूर्ण केला जाईल. तसेच वीरनारींच्या जमीन वाटपाची प्रलंबित प्रकरणे निकाली काढून त्यांना जमीन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू.

नांदेडमध्ये सैनिक संकुल उभारणी अत्यावश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. यासाठी प्रशासनाकडे १० एकर जमीन मागणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रस्तावित संकुलात सीएसडी कँटीन, देशपातळीवरील हॉलिडे होमप्रमाणे विश्रामगृह, ईसीएचएससाठी स्वतंत्र इमारत आणि विविध कार्यक्रमांसाठी लग्नासह माजी सैनिकांच्या कार्यक्रमांसाठी प्रशस्त सभागृह उभारण्यात येणार आहे. यासाठी केंद्र शासनाची मदत घेणार असल्याचेही सांगण्यात आले.

या बैठकीला संघटनेचे प्रमुख सल्लागार तहसीलदार कमलाकर शेटे, जिल्हाध्यक्ष जयसिंह कांबळे, संघटना सचिव भास्कर कळणे, कोषाध्यक्ष प्रभाकर डाके, उपाध्यक्ष बागडे, सदस्य कॅप्टन विठ्ठल कदम, वीरनारी ज्योती थोरात, सविता इंगोले, सैनिक कल्याण कार्यालयाचे कल्याण संघटक बळीराम गिराम आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात कमलाकर शेटे यांनी जिल्ह्यातील माजी सैनिकांसाठी असलेले सैनिक वसतिगृह, विश्रामगृह व ईसीएचएस पॉली क्लिनिक यांची माहिती दिली.

# जिल्ह्यातील न्यायालयात १२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेडच्यावतीने १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा न्यायालयात, जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात तसेच कौटुंबिक न्यायालय नांदेड येथे ही राष्ट्रीय लोकअदालत संपन्न होईल. सर्व संबंधित पक्षकारांनी या राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रह्मे व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश शदर जी. देशपांडे यांनी केले आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाईचे प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, धनादेश अनादरीत झाल्याबाबतची प्रकरणे तसेच कौटुंबिक न्यायालयातील तडजोड होण्यायोग्य प्रकरणे, ग्राहक तक्रार निवारण मंच, सहकार न्यायालय व कामगार न्यायालयातील प्रकरणे इत्यादी प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

# मध्यवर्ती बँकेच्या नवनिर्वाचित संचालिका सौ. संगीता पाटील डक यांचा पिंपळगाव येथे सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीमध्ये सौ. संगीताताई विठ्ठल पाटील डक ह्या प्रचंड मताने विजय झाल्याबद्दल नांदेड तालुक्यातील पिंपळगाव कोरका ग्रामपंचायत आणि सेवा सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा नुकताच सत्कार केला.

ग्रामपंचायत कार्यालय पिंपळगाव कोरका येथे जिल्हा बँकेच्या नवनिर्वाचित संचालिका सौ. संगीताताई विठ्ठल पाटील डक यांचा शाल, हार आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. संगीताताई डक म्हणाल्या की, आगामी काळात गावकऱ्यांना जिल्हा बँकेच्या माध्यमातून चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. यावेळी सरपंच, उपसरपंच, सेवा सोसायटीचे चेअरमन तसेच यांच्यासह दादाराव पावडे, माधवराव भोसले, पुंडलिकराव बोकारे, दत्तराम बडवणे, शेख शादुल्ला, विष्णू पाटील, सुभाष पवार, अंबादास पवार, बालाजी डुकरे, बाबुराव जाधव, व्यंकटराव जाधव, बबन डुकरे, पुरबाजी डुकरे, रवी पाटील, मधुकर पाटील, हिरामण देशमुख, गोविंद जाधव, सदाशिव डुकरे, दिगंबर बडवणी, मंगेश जाधव, संजय डुकरे पैलवान, अमिताभ शेख, मुसा शेख, चांदू जाधव, माधव डुकरे, व्यंकटराव डुकरे, बालाजी माधवराव डुकरे, सटवाजी जाधव, केशव डुकरे, छगन जाधव, बाबुराव पाटील, अमोल जाधव, नारायण जाधव, आनंदा वाघोळे व गावकरी यांची उपस्थिती होती.

# प्रगतीमंत्र

## रात्री नोकरी, दिवसा व्यवसाय; 10 लाखांच्या बचतीतून उभी केली 62 कोटींची कंपनी!

**यश एका रात्रीत मिळत नाही. त्यामागे सातत्यपूर्ण मेहनत, अडचणींचा सामना करण्याची तयारी आणि योग्य संधी ओळखण्याची क्षमता असते. आशीष पांडे आणि सुमित कुमार यांची कहाणी याचे उत्तम उदाहरण आहे. नोएडामध्ये रात्रीच्या पाळीत नोकरी करत असताना दोघांनी व्यवसाय सुरू केला आणि आज त्यांच्या कंपनीने तब्बल ६२ कोटी रुपयांची उलाढाल गाठली आहे. दोघांनी २०२१ मध्ये बचतीतील अवघे १० लाख रुपये गुंतवून बायबाय टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेडची स्थापना केली. याच कंपनीअंतर्गत त्यांनी 'बायबाय कार्ट' (BuyBuyCart-BBC) हा व्यवसाय सुरू केला. आज कंपनीच्या नेटवर्कमध्ये सुमारे ३०० किराणा दुकाने जोडली गेली आहेत. २०३० पर्यंत ही संख्या १,००० पेक्षा अधिक दुकानांपर्यंत नेण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे.**



### दिवसा व्यवसाय, रात्री नोकरी

व्यवसायाची सुरुवात केल्यानंतर दोघांचे जीवन अत्यंत धावपळीचे झाले. दिवसा ते किराणा दुकानदारांच्या भेटी घेत, मालाची व्यवस्था करत, वितरणाची कामे पाहत आणि विक्रेत्यांशी दरांबाबत चर्चा करत, तर रात्री कुटुंबाला आर्थिक आधार देण्यासाठी तसेच व्यवसायासाठी भांडवल उभारण्यासाठी नोकरी करत होते. सुरुवातीच्या काळात व्यवसायातील जवळपास प्रत्येक काम त्यांनाच करावे लागत होते. माल चढवणे-उतरणे, बिल तयार करणे, वितरण करणे यापासून दुकानदारांशी व्यवहार करण्यापर्यंतची कामे दोघे स्वतःच सांभाळत होते.

### ट्रक बेपत्ता; मोठे नुकसान

व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात त्यांच्यासमोर एक मोठे संकट उभे राहिले. ईशान्य भारतात जाणारा त्यांच्या मालाने भरलेला ट्रक तब्बल एका आठवड्यासाठी बेपत्ता झाला. नंतर तपासात ट्रकचालकाने माल उतरवून त्याचा वापर बेकायदेशीर मद्याच्या तस्करीसाठी केल्याचे समोर आले. या घटनेमुळे दोघांना मोठा आर्थिक तसेच कायदेशीर फटका बसला. मात्र, त्यांनी हार मानली नाही. उलट या अनुभवातून धडा घेत त्यांनी आपली पुरवठा साखळी अधिक मजबूत केली.



### 2030 पर्यंत 1,000 हून अधिक दुकानांचे लक्ष्य

२०२१ मध्ये एका छोट्या दुकानापासून सुरू झालेला हा प्रवास आता पंजाब, बिहार, केरळ, ईशान्य भारत आणि काश्मीरपर्यंत पोहोचला आहे. सध्या सुमारे ३०० दुकाने बायबाय कार्टच्या नेटवर्कशी जोडलेली आहेत. कंपनीचे लक्ष्य २०३० पर्यंत १,००० पेक्षा अधिक किराणा दुकाने आपल्या नेटवर्कशी जोडण्याचे आहे.

### व्यवसायाची कल्पना कशी सुचली?

२०२१ मध्ये आशीष आणि सुमित दिल्ली-एनसीआरमध्ये एका अमेरिकन कंपनीत रात्रीच्या पाळीत नोकरी करत होते. त्याच काळात देशात जलद वितरण सेवा आणि ऑनलाइन किराणा खरेदी करणाऱ्या ॲप्सचा वापर झपाट्याने वाढत होता. त्याचा परिणाम पारंपरिक किराणा दुकानांच्या व्यवसायावर होऊ लागला होता. मात्र, दोघांनी किराणा दुकानांकडे जुन्या पद्धतीचा व्यवसाय म्हणून पाहिले नाही. त्यांच्या लक्षात आले की या दुकानांची सर्वात मोठी ताकद म्हणजे स्थानिक ग्राहकांचा विश्वास. या दुकानांना आधुनिक तंत्रज्ञान आणि कार्यक्षम व्यवस्थापन प्रणालीशी जोडण्याची गरज आहे, असा विचार त्यांनी केला. याच विचारातून बायबाय कार्टची संकल्पना जन्माला आली.

### 90 हजारांहून अधिक उत्पादने

बायबाय कार्टच्या नेटवर्कमध्ये सध्या ९० हजारांहून अधिक उत्पादने आणि १,००० पेक्षा जास्त ब्रँड उपलब्ध आहेत. स्थानिक उत्पादनांसोबतच कंपनी स्वतःच्या खासगी उत्पादनांच्या ब्रँडलाही विस्तार देत आहे. कंपनीने गाझियाबाद येथे स्वतःचे गोदाम उभारले आहे. त्यामुळे मालसाठा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम झाले असून विविध राज्यांमध्ये मालाची वेळेत पोहोच सुनिश्चित करण्यास मदत होत आहे.

### बायबाय कार्टचे व्यवसायाचे मॉडेल काय?

बायबाय कार्ट FOFO (Franchise Owned, Franchise Operated) या पद्धतीवर काम करते. विशेष म्हणजे कंपनी दुकानदारांकडून कोणतेही फ्रँचायझी शुल्क किंवा रॉयल्टी घेत नाही. कंपनी पारंपरिक किराणा दुकानांना आधुनिक रूप देण्यासाठी त्यांना डिजिटल बिलिंग व्यवस्था, मोबाइल ॲप, आधुनिक दुकानाची मांडणी, ब्रँडिंगसाठी मदत, सुधारित व्यवस्थापन प्रणाली यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देते. त्यामुळे पारंपरिक किराणा दुकाने आधुनिक सुपरमार्केटप्रमाणे कार्य करू लागली आहेत. पूर्वी केवळ ८ ते ९ टक्के नफ्याच्या फरकावर चालणाऱ्या अनेक दुकानांच्या नफ्यात या व्यवस्थेमुळे वाढ झाली आहे.

### 'किराणा व्यवसायातील जिओ' बनण्याचे स्वप्न

आशीष पांडे आणि सुमित कुमार यांच्यासाठी यशाची व्याख्या केवळ ६२ कोटी रुपयांच्या उलाढालीपुरती मर्यादित नाही. स्थानिक पातळीवर अनेक वर्षे ग्राहकांना सेवा देणाऱ्या किराणा दुकानदारांना आधुनिक, डिजिटल आणि अधिक शिस्तबद्ध पद्धतीने व्यवसाय करण्यास सक्षम बनवणे हीच आपली खरी उपलब्धी असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. देशातील छोट्या दुकानदारांनाही डिजिटल आणि संघटित किरकोळ बाजारपेठेतील मोठ्या कंपन्यांशी स्पर्धा करता यावी, यासाठी बायबाय कार्टला किराणा व्यवसायातील 'जिओ' बनवण्याचे स्वप्न आशीष आणि सुमित यांनी पाहिले आहे. १० लाखांच्या बचतीतून सुरू झालेला हा प्रवास आज ६२ कोटींच्या व्यवसायापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी मोठे भांडवलच आवश्यक असते, या समजुतीला या दोघांची कहाणी छेद देते. योग्य कल्पना, सातत्यपूर्ण मेहनत आणि संकटांवर मात करण्याची जिद्द असेल तर छोट्या सुरुवातीपासूनही मोठी कंपनी उभी करता येते, हे त्यांनी सिद्ध केले आहे.



# MBBS-BDS प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदणी सुरू

## नोंदणी 'रीसेट' करण्याचीही सुविधा, जाणून घ्या सर्व माहिती...

**वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. मेडिकल काउन्सेलिंग कमिटीने (MCC) NEET UG 2026 च्या अखिल भारतीय कोटा (AIQ) जागांसाठी पहिल्या फेरीच्या समुपदेशनातील पसंतीक्रम नोंदणीची प्रक्रिया सुरू केली आहे. MBBS आणि BDS अभ्यासक्रमांसाठी इच्छुक उमेदवार आता आपल्या पसंतीच्या महाविद्यालये व अभ्यासक्रमांची निवड करून त्यांना प्राधान्यक्रमानुसार नोंदवू शकतात...**

NEET UG 2026 च्या पहिल्या फेरीसाठी नोंदणी प्रक्रिया ५ ऑगस्ट २०२६ रोजी सुरू झाली होती, तर पसंतीक्रम नोंदविण्याची प्रक्रिया ७ ऑगस्टपासून सुरू झाली आहे. यंदा MCC ने उमेदवारांसाठी 'अनलॉक/रीसेट नोंदणी' ही सुविधा देखील उपलब्ध करून दिली आहे. नोंदणी करताना चुकीची माहिती भरली गेली असेल किंवा चुकीचे पर्याय निवडले असतील, तर उमेदवारांना त्यामध्ये दुरुस्ती करण्याची संधी मिळणार आहे.





### चुकीची माहिती भरल्यास नोंदणी 'रीसेट' करता येणार

MCC ने जारी केलेल्या अधिकृत सूचनेनुसार, नोंदणीच्या वेळी चुकीची माहिती भरलेल्या किंवा चुकीचे पर्याय निवडलेल्या उमेदवारांना 'अनलॉक/रीसेट नोंदणी' या पर्यायाचा वापर करून नोंदणीतील तपशील दुरुस्त करता येणार आहेत. ही सुविधा १२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांकडून नोंदणी करताना चूक झाली आहे, त्यांनी दिलेल्या मुदतीपूर्वी आवश्यक दुरुस्ती करणे महत्त्वाचे आहे.

### MBBS आणि BDS प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदणी सुरू

NEET UG 2026 च्या पहिल्या फेरीसाठी महाविद्यालये आणि अभ्यासक्रमांचा पसंतीक्रम नोंदविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पात्र उमेदवार अधिकृत समुपदेशन संकेतस्थळावर जाऊन MBBS आणि BDS अभ्यासक्रमांसाठी आपल्या पसंतीच्या महाविद्यालयांची निवड करू शकतात. उमेदवारांनी आपला NEET क्रमांक, पात्रता आणि मागील वर्षांच्या प्रवेशाच्या कट-ऑफचा कल लक्षात घेऊन महाविद्यालयांना योग्य प्राधान्यक्रम द्यावा. पसंतीक्रम नोंदवताना काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पहिल्या फेरीतील पसंतीक्रम नोंदविण्याची अंतिम मुदत १३ ऑगस्ट २०२६ आहे.


### द्यिार्थ्यांनी काय काळजी घ्यावी?

NEET UG समुपदेशनात महाविद्यालयांची निवड करताना विद्यार्थ्यांनी केवळ मागील वर्षांचा कट-ऑफ न पाहता स्वतःचा NEET क्रमांक, पात्रता, महाविद्यालयाची प्रतिष्ठा, अभ्यासक्रम, उपलब्ध सुविधा आणि शुल्क यांचा विचार करावा. तसेच, पसंतीक्रम नोंदवल्यानंतर तो योग्य प्रकारे लॉक झाला आहे की नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे. चुकीची माहिती भरली असल्यास MCC ने दिलेल्या 'अनलॉक/रीसेट नोंदणी' सुविधेचा वापर करून १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजण्यापूर्वी आवश्यक दुरुस्ती करावी. NEET UG 2026 च्या अखिल भारतीय कोट्यातील जागांसाठी पहिल्या फेरीचे जागावाटप १७ ऑगस्टला जाहीर होणार आहे. जागा मिळालेल्या विद्यार्थ्यांना १८ ते २२ ऑगस्टदरम्यान संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

| प्रक्रिया | तारीख |
|---|---|
| पहिल्या फेरीची पसंतीक्रम नोंदणी सुरू | ७ ऑगस्ट २०२६ |
| पसंतीक्रम लॉक करण्यास सुरुवात | १२ ऑगस्ट २०२६, सकाळी ११ वा. |
| पसंतीक्रम नोंदणीची अंतिम मुदत | १३ ऑगस्ट २०२६ |
| पसंतीक्रम लॉक करण्याची अंतिम मुदत | १३ ऑगस्ट २०२६ |
| पहिल्या फेरीतील जागावाटपाचा निकाल | १७ ऑगस्ट २०२६ |
| महाविद्यालयात प्रवेशासाठी उपस्थिती | १८ ते २२ ऑगस्ट २०२६ |

### 85 टक्के राज्य कोट्याच्या जागांसाठी स्वतंत्र समुपदेशन

**अखिल भारतीय कोट्याव्यतिरिक्त विविध राज्यांनी MBBS आणि BDS अभ्यासक्रमांच्या ८५ टक्के राज्य कोट्यातील जागांसाठी स्वतंत्र NEET समुपदेशन प्रक्रिया सुरू केली आहे.**



## तीन व्यवसाय अपयशी ठरले; आज पाच ब्रँड्सच्या मालक, वार्षिक कमाई 143 कोटींहून अधिक!

**सोशल मीडियावर दिसणाऱ्या यशाच्या झगमगाटामागे अनेक वर्षांचा संघर्ष, अपयश आणि त्याग दडलेला असतो. सिंगापूरमधील महिला उद्योजक मिझा नाझिली (Miza Nazili) यांची कहाणी याचे उत्तम उदाहरण आहे. एकेकाळी त्यांना नोकरी गमवावी लागली होती. शालेय शिक्षणही पूर्ण करता आले नाही. त्यांच्या बँक खात्यात एका काळी अवघे २० डॉलर (सुमारे १,९०० रुपये) शिल्लक होते. तीन वेगवेगळे व्यवसाय अपयशी ठरल्यानंतर त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर सुमारे ८० हजार डॉलर म्हणजेच ७६ लाख रुपयांचे कर्ज झाले होते. मात्र, या कठीण परिस्थितीतही त्यांनी हार मानली नाही. आज त्या पाच ब्रँड्सच्या मालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांच्या कंपन्यांचा एकूण महसूल १५ दशलक्ष डॉलर म्हणजेच १४३ कोटी रुपयांहून अधिक असल्याचे सांगितले जाते.**



### खर्च वाचवण्यासाठी स्वत:च आणायच्या वस्तू

व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात आर्थिक अडचणींमुळे वाहतूक आणि माल पोहोचवण्याचा खर्च करणेही त्यांच्यासाठी कठीण होते. त्यामुळे त्या दररोज सिंगापूरहून मलेशियातील जोहोर बाहरू येथे स्वतः जाऊन व्यवसायासाठी आवश्यक माल आणत असत. त्यांच्या आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीशी संबंधित उत्पादनांचा व्यवसाय वाढवण्याचे प्रयत्न सुरू होते. 'शॉर्टकटएक्स' (Shortcutx) यांसारखी उत्पादने त्यांनी मोठ्या किरकोळ विक्रेत्यांकडे नेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला अनेक मोठ्या विक्रेत्यांनी त्यांची उत्पादने स्वीकारण्यास नकार दिला. मात्र, या नकारामुळे त्या खचल्या नाहीत. सातत्याने प्रयत्न करत राहिल्यानंतर त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळू लागली. आज त्यांच्या उत्पादनांची विक्री १०० हून अधिक विक्री केंद्रांवर होत असल्याचे सांगितले जाते.

### 143 कोटी रुपयांहून अधिक व्यवसायाचे साम्राज्य

अनेक अपयश आणि संघर्षानंतर आज मिझा नाझिली यांनी व्यवसायाच्या क्षेत्रात मोठे यश मिळवले आहे. त्या पाच प्रमुख ब्रँड्सच्या मालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. त्यांच्या कंपन्यांचा एकत्रित महसूल १५ दशलक्ष डॉलर म्हणजेच १४३ कोटी रुपयांहून अधिक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यांचे मुख्यालय दोन इमारतींमध्ये पसरलेले असून ते सहा मजली आहे. नुकतीच त्यांनी २०२६ मॉडेलची नवीन पोर्श कार खरेदी केल्याचेही सांगितले जाते.



### नोकरी गेली आणि उद्योजकतेचा प्रवास सुरू झाला

मिझा नाझिली यांनी सोशल मीडिया मंचावर आपल्या संघर्षाची कहाणी सांगितली आहे. पूर्णवेळ नोकरीतून त्यांना काढून टाकण्यात आल्यानंतर त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र, व्यवसायाच्या सुरुवातीच्या काळात त्यांना एकापाठोपाठ एक धक्के बसले. त्यांनी सुरू केलेले तीन वेगवेगळे व्यवसाय अपयशी ठरले. परिणामी त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर सुमारे ८० हजार डॉलर म्हणजे ७६ लाख रुपयांचे कर्ज झाले. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की, एका टप्प्यावर त्यांच्या बँक खात्यात २० डॉलरपेक्षाही कमी रक्कम शिल्लक होती. मात्र, याच कठीण काळातून त्यांनी पुन्हा उभारी घेण्याचा निर्णय घेतला.

### 'इतरांशी स्वत:ची तुलना करू नका'

मिझा नाझिली यांनी सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून आपल्या अनुभवातून इतरांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीचा जीवनप्रवास आणि यशाची वेळ वेगळी असते. त्यामुळे स्वतःची तुलना इतरांशी कधीही करू नये. लोकांना एखाद्या व्यक्तीचे यश आणि उपलब्धी दिसतात; मात्र त्या यशामागील अनेक वर्षांचा संघर्ष, अपयश आणि त्याग अनेकदा दिसत नाही. प्रत्येक यशाची सुरुवात एका कठीण टप्प्यातूनच होते, असा संदेश त्यांनी दिला आहे. मिझा नाझिली यांची कहाणी सांगते की, अपयश म्हणजे शेवट नव्हे. उलट ते नव्याने सुरुवात करण्याची संधी असू शकते. नोकरी गमावणे, तीन व्यवसाय अपयशी ठरणे आणि लाखो रुपयांचे कर्ज अशी संकटे समोर असूनही त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत. त्याच जिद्दीच्या बळावर आज त्यांनी पाच ब्रँड्स उभे करून कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय उभारला आहे.

# २५ हजारांच्या नोकरीसाठी बोगस परीक्षा; संभाजीनगरमध्ये हजारो उमेदवारांची फसवणूक, विद्यार्थी संतप्त



**संभाजीनगर(प्रतिनिधी)** – वैद्यकीय प्रवेशासाठी महत्त्वाची आणि अनिवार्य असलेल्या नीट परीक्षेचा पेपर फुटल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त करण्यात आला होता. त्यानंतर, जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनात देशभरातील तरुणाईचा सक्रिय सहभाग पाहायला मिळाला. त्यातूनच, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदाचा राजीनामाही द्यावा लागला. मात्र, अद्यापही परीक्षा आणि नोकरीवरून उमेदवारांची फसवणूक सुरूच असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, सीजेपीचं नेतृत्व करणाऱ्या अभिजीत दीपके यांच्या संभाजीनगरमध्ये नोकरीच्या आमिषाने हजारो युवकांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

विमानतळावर आकर्षक नोकरी देण्याचे आमिष दाखवत एका खासगी कंपनीने महाराष्ट्रातील हजारो सुशिक्षित बेरोजगारांना गंडा घातल्याचा आरोप करण्यात येत आहे. शासकीय भरतीप्रमाणेच पारदर्शक प्रक्रिया असल्याचा देखावा निर्माण करून प्रत्येक विद्यार्थ्याकडून ५०० ते ७०० रुपयांची फी उकळण्यात आली. महिन्याला २५ हजार रुपयांचा पगार आणि विमानतळावरील झगमगीत नोकरीच्या आमिषाला बळी पडत राज्यभरातील शेकडो विद्यार्थी आज छत्रपती संभाजीनगरच्या उस्मानपुरा येथील एका शाळेत पोहोचले, पण आपली फसवणूक झाल्याचा दावा आता या विद्यार्थ्यांनी केला आहे.

विशेष म्हणजे महिन्याभरापासून ऑनलाईन अर्ज भरून, अभ्यासाची तयारी करून परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना खरी परिस्थिती लक्षात येताच त्यांच्या पायाखालची वाळूच सरकली. कंपनीने सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन संगणकीय परीक्षा होणार असल्याचे सांगितले होते, मात्र प्रत्यक्ष केंद्रावर एकही संगणक उपलब्ध नव्हता. अधिक विचारणा केली असता, परीक्षा घेण्यासाठी आलेली कथित 'थर्ड पार्टी' कंपनीही हात वर करत आम्हाला काहीच माहिती नाही असे सांगत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून विद्यार्थ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

दरम्यान, देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी असून युवकांच्या हाताला काम नाही, म्हणावी तशी नोकरी नाही, असे सांगत अभिजीत दीपके जेन झी तरुणाईचा संताप सर्वत्र दिसत असल्याचे सांगतात. संभाजीनगरमधील घटनाही त्याचीच पुनरावृत्ती असल्याचे दिसून येत आहे.

# भारत-पाक सीमेवर घुसखोरीचा प्रयत्न फसला; बीएसएफच्या गोळीबारात संशयित ठार

**पंजाब (वृत्तसंस्था)** –भारत-पाकिस्तान आंतरराष्ट्रीय सीमेवर घुसखोरीचा प्रयत्न सीमा सुरक्षा दलाने उधळून लावला. पंजाबमधील अमृतसर जिल्ह्यातील दाओके गावाजवळ ही घटना घडली. भारताच्या हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका संशयिताला बीएसएफच्या जवानांनी गोळीबार करून ठार केले.

मिळालेल्या माहितीनुसार, बीएसएफचे जवान पहाटे दाओके गावाजवळील काटेरी कुंपणाच्या परिसरात नियमित गस्त घालत होते. त्यावेळी कुंपणाजवळील झुडपांमध्ये काहीतरी संशयास्पद हालचाल जवानांच्या निदर्शनास आली. जवानांनी झुडपांमध्ये असलेल्या व्यक्तीला बाहेर येण्यास सांगितले. काही वेळाने तो व्यक्ती बाहेर आला आणि काटेरी कुंपणाच्या दिशेने पुढे जाऊ लागला. सुरक्षा जवानांनी संशयिताला थांबण्याचा इशारा दिला. मात्र, त्याने जवानांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करत भारतीय हद्दीच्या दिशेने पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात येत आहे. यानंतर बीएसएफच्या जवानांनी गोळीबार केला. या गोळीबारात संशयिताचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर बीएसएफने तातडीने घरिंदा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि परिसराची तपासणी सुरू केली. मृत व्यक्तीकडे कोणतेही ओळखपत्र किंवा अन्य कागदपत्रे आढळली नसल्याने त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. घटनास्थळावरून कोणतीही प्रतिबंधित वस्तू किंवा संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आले नसल्याची माहिती आहे.

बीएसएफ जवानांच्या तक्रारीच्या आधारे घरिंदा पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी ताब्यात घेण्यात आला असून, या व्यक्तीची ओळख आणि तो सीमा परिसरात नेमका कोणत्या उद्देशाने आला होता, याचा तपास केला जात आहे. दरम्यान, या घटनेनंतर भारत-पाकिस्तान सीमेवरील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे.

# पुण्यातील कंपनीच्या संचालकांनी महिलेला चक्क पोर्तुगालमधील बिअर शॉपच्या मालकाला विकले




**नागपूर(प्रतिनिधी)** – युरोपमध्ये मोठ्या पगाराच्या नोकरीचे आमिष दाखवून नागपूरच्या एका महिलेला पुण्यातील कथित कंपनी संचालकांनी चक्क पोर्तुगालमध्ये विकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तब्बल महिनाभर छळ सहन केल्यानंतर या महिलेने स्वतःची सुटका करून घेत पुन्हा पुणे गाठले आणि नंतर पोलिसांकडे तक्रार नोंदवली. मानवी तस्करी आणि लैंगिक शोषणाच्या या खळबळजनक प्रकरणात पुणे पोलिसांनी तपास केल्यानंतर धक्कादायक माहिती उघडकीस आली. देश-विदेशातील अनेकांना विदेशात विकणाऱ्या या टोळीचे चार सदस्य पुण्यातील तर चार सदस्य पोर्तुगालमधील आहेत.

पीडित महिला २८ वर्षांची आहे. ती जॉब सर्चिंग करीत असताना डिसेंबर २०२५ मध्ये इंस्टाग्रामवर पुण्यातील विमान नगर परिसरातील 'वी मायग्रेट' नावाच्या कन्सल्टन्सीची तिला माहिती मिळाली. संपर्क केल्यावर एजन्सीने तिला पोर्तुगालमध्ये कॅशिअरच्या नोकरीचे आमिष दाखवले. दरमहा १.५ लाख रुपये पगार आणि दररोज फक्त ८ तासांचे काम, असे सांगण्यात आले. नोकरीसाठी विविध प्रक्रियेकरिता तिच्याकडून टप्प्याटप्प्याने ११ लाख रुपये उकळण्यात आले. धक्कादायक म्हणजे, नंतर आरोपींनी तिची पोर्तुगालमधील एका बिअर शॉपच्या मालकाला विक्री केली. तिथे तिच्याकडून जबरदस्तीने नको ते काम करून घेण्यात आले. जेव्हा महिलेने याचा विरोध केला, तेव्हा मालकाने तिला 'तुला खरेदी करण्यासाठी मी भारतातील एजंट्सना पैसे दिले आहेत' असे सांगितले. या घटनेने हादरलेल्या महिलेने आपल्या पतीशी संपर्क साधून आपण फसवले गेलो, याची माहिती दिली. पतीने तिला दिलासा देऊन तेथून बाहेर पडण्याचा सल्ला दिला.

महिनाभर सदरील महिलेने जीवनयातना भोगल्यानंतर तिने आपली सुटका करून देश गाठला, आणि तक्रार करून तरुण-तरुणीची मानवी तस्करी करणाऱ्या रॅकेटचा भांडाफोड केला. पीडितेने पुणे गुन्हे शाखेशी संपर्क साधला. त्यानंतर गुन्हे शाखेने पुणे विमानतळ पोलीस ठाण्यात ८ आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला. प्रतिभा भाटी, अनिलकुमार, अजहर शेख, वामसी, चैतन्य, हिम्मत सिंग आणि कपिल मिश्रा अशी आरोपींची नावे आहेत. पोलीस सध्या या आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी रॅकेटचा तपास करत असून, अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यताही पोलिसांनी वर्तविली आहे.

## जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड.

SCEA

सहकार भवन, मू-विकास बँक इमारत दुसरा मजला, आय. टी. आय. समोर, नांदेड.
(Telephone No. (02462)284886; E-mail Id : ddr.nanded2017@gmail.com)

जा.क्र. जिउनिनां/कक्ष-३/निवडणूक/प्रा.मत.यादी कार्यक्रम(ब)वर्ग संस्था/२७०३/२०२६ दिनांक :- ०७ ऑगस्ट, २०२६.

**व्यवस्थापक समिती पंचवार्षिक निवडणूक कार्यक्रम सन २०२६ ते २०३१ (ब वर्ग संस्था)**
**मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरीता)**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम, १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम,२०१४ (सुधारणासह) चे नियम २ (तीन) (१ ते १२) आणि नियम (११) तसेच मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील परिपत्रक जा.क्र. १५७४ दि. २२/०५/२०२० मधील मार्गदर्शक सुचनेनुसार व मा. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. २६०४/२६, दि. १४/०७/२०२६ अन्वये निश्चित करुन दिलेला अर्हता दिनांक ०१/०७/२०२६ या अर्हता दिनांकावरील तयार केलेल्या दोन औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रारुप मतदार यादी अंतिम करण्याचा कार्यक्रम खालील प्रमाणे प्रसिध्द करीत आहे.

**१. राजे छत्रपती शाहू महाराज तेलधान्य प्रक्रिया औद्योगिक उत्पादक मागासवर्गीय सहकारी संस्था म. मनाठा, ता. हदगाव.**
**२. चंद्रसंगीता औद्योगिक मागासवर्गीय सहकारी संस्था म. संबोधीनगर, तळेगाव ता. हदगाव.**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ | स्थळ / ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे. | १०/०८/२०२६ | स. ११.०० वाजता | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. हदगाव व संबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप मागविणे. | १०/०८/२०२६ ते १९/०८/२०२६ | कार्यालयीन वेळेत | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर हरकती/आक्षेप वर निर्णय घेणे. | २७/०८/२०२६ | कार्यालयीन वेळेत | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | ३१/०८/२०२६ | सायं. ४.०० वाजता | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. हदगाव व संबंधीत संस्थेच्या सूचना फलकावर |

(शाहुराज हिरे)
**जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,नांदेड.**

**तहसीलदार तथा दंडाधिकारी नायगाव (खै.) यांचे न्यायालयात**
**प्रकरण-जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत.**
**अर्ज क्रं. १३७/२०२६**

## जाहीर प्रगटन

विषयः- जन्म /मृत्यू नोंदणी अधिनियम सुधारित आणि जन्म व मृत्यू नोंदणी १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबतचे

संदर्भ- अर्जदार शुभांगी अवधुत ढवळे रा. पाटोदा त.ब. ता. नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि. २९/०६/२०२६

ज्याअर्थी अर्जदार शुभांगी अवधुत ढवळे रा. पाटोदा त.ब.ता. नायगांव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि. २९/०६/२०२६ नामे अर्जदार शुभांगी अवधुत ढवळे यांचा जन्म दि. ११/१०/२००६ रोजीची जन्म नोंद आदेश मिळणे बाबत विनंती ता. नायगांव (खै.) केली आहे. तसेच अर्जदार यांनी ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा त.ब. जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू दाखल्याचा मागणी अर्ज दिला असता संबधित उपनिबंधक जन्म / मृत्यू नोंद ग्राम पंचायत पाटोदा त.ब. ता. नायगांव (खै.) जि.नांदेड येथे जन्म/मृत्यू नोंद अधिनियम १९६९ च्या कलम ११ अन्वये नमुना १० (अ) व १० (ब) अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुलब्धता प्रमाणपत्र दि. ०४/०६/२०२६ रोजीचे अर्जासोबत सादर केलेले आहे.

त्याअर्थी, अर्जदार यांनी त्यांच्या वकीलामार्फत या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आणि कलम १३ (३) नुसार जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदार शुभांगी अवधुत ढवळे यांचा जन्म दि. ११/१०/२००६ जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा त.ब. ता. नायगांव (खै.) जि.नांदेड यांनी जन्म नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने अर्जदार यांची जन्माची खात्री करण्यासाठी या जाहिर प्रगटना व्दारे वर्तमानपत्रात प्रसीध्दी करण्यात येत आहे. जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी तहसिलदार तथा तालूका दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावा, अन्यथा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरुन अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासह देण्यात येते.

**तहसीलदार नायगांव (खै.) तथा**
**तालुका दंडाधिकारी नायगांव (खै.)**

## मूल दस्त (रजिस्ट्री) हरवलेबाबत जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की माझे अशिल भुमन्ना नागोजीराव आक्केमवाड रा. विष्णूनगर, नांदेड येथील रहिवाशी असून त्यांची मिळकत प्लॅट क्र.१० ज्याचा न.पा. पिन क्र. ४०२०३०७१०५२, टीटीएस नं. ९६९३ पैकी ज्याचे क्षेत्रफळ २११.७८ चौ. मीटर (विक्रिखातानुसार), जो मौजे अस्सदुल्लाबाद, पत्रकार सहवास सोसायटी ता. जि. नांदेड येथील असून सदरील मिळकतीचे मालक व ताबेदार असून, त्यांचे मालकी संबंधित असलेले लोक खरेदी खत क्र. २-१६३६/२०१३ दिनांक ०१/०३/२०१३ अन्वये खरेदी केलेल्या मिळकतीचे मालकी संबंधित मूळ दस्त दिनांक ०३/०८/२०२६ रोजी शिवाजीनगर ते साठे चौकापर्यंत नांदेड येथून ऑटोने प्रवास करीत असताना हरवले आहे. त्याबाबत माझे अशिलानी पोलीस स्टेशन नांदेड येथे मूळदस्त गहाळ झाले बाबत फिर्याद दिनांक ०९/०८/२०२६ रोजी दिले आहे. तरीही कोणाला सापडल्यास, आढळल्यास, मला खालील पत्यावर कळवावे किंवा कुठल्याही व्यक्तीला/वित्तीय संस्थेला या मालमत्ते संदर्भात आक्षेप असल्यास ७ दिवसांच्या आत मला लेखी स्वरूपात खालील पत्यावर कळवावे. जर ७ दिवसांच्या आत कुणाचाही कुठल्याही स्वरूपाचा हक्क/अधिकार/ लेखी स्वरूपात आक्षेप न आल्यास त्यानंतर कोणाचाही कुठल्याही स्वरूपाचा हक्क/अधिकार/आक्षेप स्वीकारण्यात येणार नाही व माझे अशील त्यास जबाबदार राहणार नाहीत.

**जाहीर प्रगटन देणार**
**अॅड. श्री विजय मुखेडकर**
रा. आयुर्वेदिक कॉलेज समोर,
वजिराबाद, नांदेड
मो. ९८६००४३९९८

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, 'कै. दिलीपराव लक्ष्मणराव जोशी' हे आमच्या जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था, फत्तेजंगपूर, तालुका व जिल्हा नांदेड या संस्थेचे सभासद नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या क्षेत्रातील संस्थेच्या मालकीची जमीन गट नंबर १४२ मौजे फत्तेजंगपूर, ता. जि. नांदेडमध्ये संस्थेच्या लेआऊटप्रमाणे त्यांच्या मालकीचा व ताब्यातील प्लॉट नंबर (१०) दहा हा आहे. कै. दिलीपराव लक्ष्मणराव जोशी यांचे दिनांक १०/०५/२०२५ रोजी निधन झाले असून, सदरील प्लॉट नंबर (१०) दहा त्यांचे वारस १)श्री विशाल दिलीपराव जोशी २) श्री विश्वास दिलीपराव जोशी ३) श्री विश्वदीप दिलीपराव जोशी यांच्या नावावर हस्तांतरण कार्यवाही करून प्लॉट हस्तांतरण करून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह त्यांनी संस्थेकडे विनंती अर्ज दिलेला आहे.

तरी या सदरील प्लॉट हस्तांतरण कार्यवाहीस कोणाचा आक्षेप असल्यास (७) दिवसांच्या आत अध्यक्ष अथवा सचिव यांच्याकडे मूळ कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. ह्या कालावधीत आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे समजून वरीलप्रमाणे प्लॉटची हस्तांतरण कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सचिव** **अध्यक्ष**
**जयप्रकाशनगर कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**
**फत्तेजंगपूर, ता. जि. नांदेड.**

## सनद हरवली

माझी अजय गौतम हौसरे या नावाची इयत्ता बारावी पासची सनद पारडी ते नांदेड दरम्यान ऑटोमध्ये प्रवास करीत असताना हरवली आहे. ज्यांना कुणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता**-मु. पारडी वैजापूर ता. मुदखेड, जि. नांदेड मो. ९८२२५००३६५

## Change In Name

**My old name is JADHAV PATIL HARSHADA ASHOKRAO which I have now changed as new name: HARSHDA APPASAHEB PATIL SO henceforth all my correspondence will be done under my new name please consider it. Signed by HARSHDA APPASAHEB PATIL Address: Ratoli, PO: Naigaon, DIST: Nanded, MAHARASHTRA – 431709.**
**Mobile no. 9834554541**

## Change In Name

My Old Name is **MOHSINABEE** Which Now I Am Changing As New Name **MOHSINABEGUM ISA SHAIKH** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same
**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name

My Old Name is **MOHAMMAD ISA** Which Now I Am Changing As New Name **ISA ABDULKHADAR SHAIKH** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same
**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name


My Old Name is **FIRDOS MOHAMMAD ISA** Which Now I Am Changing As New Name **FIRDOS ISA SHAIKH** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same
**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name

My Old Name is **MOSINA BEGUM ISAMINYA** Which Now I Am Changing As New Name **MOHSINABEGUM ISA SHAIKH** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same
**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## मराठवाडा मुक्ती संग्रामः सरकारी दप्तरी नोंद तरी ४८ हुतात्मे उपेक्षित, १४ ऑगस्टला उपोषण



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा मुक्ती संग्राम दिन (१७ सप्टेंबर १९४८) हा मराठवाड्याच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिलेला दिवस आहे. निजामाच्या अन्यायी राजवटीतून मुक्त होण्याकरिता अनेक देशभक्तांनी प्राणांची आहुती दिली. राज्यभरात ३०४ तरुण हुतात्मे झाले, त्यापैकी २५६ हुतात्म्यांसाठी शासनाने ६५ ठिकाणी स्मारके उभारली आहेत.

मात्र, नांदेड जिल्ह्यातील ४८ हुतात्मे आजही उपेक्षित आहेत. याच दुर्लक्षाविरोधात मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अभ्यासक जगदेवराव पाटील पवार पाथरडकर यांनी १४ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

सरकारी अभिलेखानुसार नांदेड जिल्ह्यात खालील ४ ठिकाणी मोठ्या संख्येने हुतात्मे झाले. कल्हाळी, ता. कंधार – ३५ हुतात्मे, वडगाव तांडा, ता. कंधार – ८ हुतात्मे, लोहा, ता. लोहा – ३ हुतात्मे आणि बामणी, ता. लोहा – २ हुतात्मे झाले आहेत. या सर्व हुतात्म्यांची जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सरकारी नोंदीत नोंद आहे आणि त्यांच्या वारसांना मानधनही मिळाले आहे. तरीही त्यांची स्मारके उभारलेली नाहीत किंवा इतर स्मारकांवरही त्यांच्या नावांचा उल्लेख नाही.

एका गावात एकच हुतात्मा झाला अशा ठिकाणीही मराठवाड्यात २० गावांमध्ये स्मारके बांधली आहेत. पण एकाच ठिकाणी ४८ हुतात्मे झाले, तिथे स्मारक नाही. ही त्यांच्या त्यागाचा आणि बलिदानाचा अवमान आहे, असे पाथरडकर यांनी सांगितले.

इसवी सन २०१९ पासून पुराव्यासह वेळोवेळी निवेदने देऊनही प्रशासनाने दखल घेतली नाही. दि. २४ जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही लेखी निवेदन देण्यात आले आहे.

या दुर्लक्षित हुतात्म्यांसाठी शासनाकडे निधी नसेल तर माझी जमीन विक्री करण्यास मी तयार आहे. गरज पडल्यास अवयव दान करण्याचीही माझी तयारी आहे. पण देशासाठी जीवाची पर्वा न करणाऱ्या वीरांच्या स्मृतीला उजाळा मिळण्यासाठी स्मारके उभारलीच पाहिजेत, अशी भावनिक मागणी पाथरडकर यांनी केली आहे.

## शिक्षक आमदार अभ्यंकर आज नांदेड दौऱ्यावर

**नांदेड (प्रतिनिधी)–**जिल्ह्यातील शिक्षक बांधवांचे प्रलंबित प्रश्न, समस्या व अडचणी जाणून घेण्यासाठी शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर हे सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी नांदेड दौऱ्यावर येत आहेत.

शिक्षक सेना, नांदेडच्या वतीने सर्व पदाधिकाऱ्यांना आणि जिल्ह्यातील शिक्षक बांधवांना या बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ज्या शिक्षक बांधवांचे प्रश्न प्रलंबित आहेत त्यांनी आपल्या प्रश्नासंदर्भातील लेखी अर्ज शिक्षक सेनेच्या पदाधिकाऱ्यांकडे देण्यासाठी दि. १० ऑगस्ट रोजी स. १० वा. शासकीय विश्रामगृह येथे उपस्थित राहावे.

शिक्षक बांधवांच्या सर्व प्रलंबित प्रश्नांबाबत अभ्यंकर हे मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड तसेच शिक्षणाधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून ते मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. याचबरोबर शिवाजी विद्यालय, नांदेड येथे आमदारांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व शिक्षक बांधवांनी आपले लेखी अर्ज व प्रश्न घेऊन वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन शिक्षक सेना, नांदेडच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्य उपाध्यक्ष विजय चव्हाण, जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, जिल्हा सरचिटणीस परशुराम एसलवाड, रवी बंडेवार, गंगाधर कदम, मनोहर भंडेवार, गोपाल बंडेवार, सचिन गायकवाड, गंगाधर करेवार, अविनाश चिद्रावार, शिवकन्या पटवे, सुकन्या खांडरे, शोभा गिरी यांच्यासह तसेच सर्व जिल्हा उपाध्यक्ष, जिल्हा समन्वयक, जिल्हा सहसचिव, जिल्हा संघटक व मार्गदर्शक यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## सिडको क्षेत्रीय कार्यालयातील विविध विभागांची महापौरांकडून पाहणी



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर सौ. कविता मुळे यांनी सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे ७ जुलै रोजी आढावा बैठक घेतली. प्रसंगी विविध विभागातील पाहणी केली. मूळ दस्तावेज संचिकासह इतर कामांची प्रशंसा करून संबंधित विभाग प्रमुखांचे अभिनंदन केले.

महापौर सौ. कविता मुळे यांचे सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे आढावा बैठक निमित्ताने प्रथमच आगमन झाले होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, गिरीश कदम, सहायक आयुक्त नितीन गाढवे, गुलाम सादेक, सतीश ढवळे, स्वामी यांच्यासह विविध विभागांचे विभाग प्रमुख व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी महापौर कविता मुळे यांनी नाव परिवर्तन विभाग, आस्थापना, लेखा विभाग, जन्म–मृत्यूसह विविध विभागांची पाहणी केली. यावेळी नाव परिवर्तन विभाग प्रमुख अर्चना जोंधळे, विठ्ठल अंबटवार, आस्थापना मीना अडबलवार, गुंठेवारी, माहिती अधिकार विभाग शेख शादुला, लेखा विभाग बालाजी लोहगावकर, जन्म–मृत्यू विभागाचे सूर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख यांनी मूळ कागदपत्रे असलेली संचिका व दैनंदिन कामे या बाबत सुव्यवस्थित ठेवलेली कागदपत्रे, कार्यालयीन स्वच्छता व मालमत्ता कर वसुलीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले या बाबत माहिती देण्यात आली. या कामाची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर त्यांनी प्रशंसा केली.

कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, कर निरीक्षक वसंत कल्याणकर, संजय नागापूरकर, मारोती सारंग, प्रकाश दर्शने, मालू एनफळे, पवळे, रमेश यशवंतकर, बालाजी लोहगावकर स्वच्छता निरीक्षक किशन वाघमारे, अर्जुन बांगडी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. तर या बैठकीस भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, अभिषेक सौदे, नगरसेवक प्रतिनिधी राजू पाटील काळे, संजय मोरे, गणेश काकडे यांची उपस्थिती होती.



**नांदेड –** आरक्षण उपवर्गीकरण विरोधी महामोर्चात सहभागी झालेले माजी मंत्री खासदार चंद्रकांत हडोरे यांच्यासमवेत डॉ. दिनेश निखाते आणि सुरेश हटकर दिसत आहेत.

**(छाया : करणसिंह बैस, नरेंद्र गडप्पा, ज्ञानेश्वर सुनेगावकर)**

## चिमुकल्या हातांनी रुजविले हरित भविष्याचे बीज; पिंपळगावच्या जि.प. शाळेत 'सीडबॉल' उपक्रम



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – वृक्षारोपणाची संकल्पना केवळ रोपे लावण्यापुरती मर्यादित न ठेवता, निसर्गाच्या कुशीतून नवी हिरवाई फुलविण्याचा अभिनव प्रयोग पिंपळगाव तालुका हदगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी केला. 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी विविध वृक्षांच्या बियांचे 'सीडबॉल' तयार करून माळरान व ओसाड जमिनीवर टाकले.

वर्गशिक्षिका सौ. सुनीता मोखंडपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मातीमध्ये विविध वृक्षांच्या बिया मिसळून सीडबॉल तयार केले. त्यानंतर हे सीडबॉल परिसरातील माळरानावर फेकण्यात आले. पावसाळ्यात माती व पाण्याच्या नैसर्गिक सहकार्याने या बियांना अंकुर फुटून भविष्यात रोपांची निर्मिती होण्यास मदत होणार आहे.

विशेष म्हणजे, पर्यावरण संवर्धनाचे धडे केवळ पाठ्यपुस्तकातून न देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आले. 'आजची बीजे, उद्याची झाडे' या भावनेतून चिमुकल्यांनी पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. बालवयातच निसर्गाशी नाते जोडणारा हा उपक्रम पालक व ग्रामस्थांच्या कौतुकाचा विषय ठरला आहे. 'चिमुकले हात, मोठी जबाबदारी' या उक्तीचा प्रत्यय देणाऱ्या या उपक्रमातून पिंपळगावच्या विद्यार्थ्यांनी हरित भविष्यासाठी एक छोटी, पण आशादायी पायरी उचलली आहे.

### इकडचं तिकडचं

## अतिलाडाने पोट्टे बिघडले का?

काही वर्षांपूर्वी नांदेडमधील एका नामांकित इंग्रजी शाळेतील नववीच्या विद्यार्थ्याच्या दप्तरात शस्त्र सापडल्याची घटना चांगलीच गाजली होती. या घटनेची आठवण पुन्हा ताजी झाली ती याच आठवड्यात नांदेड शहरातील एका शाळकरी मुलाने आपल्या वर्गमित्रावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केल्याच्या धक्कादायक घटनेमुळे. या घटनेनंतर समाजमाध्यमांवर विविध प्रतिक्रिया उमटू लागल्या आणि शाळांजवळील चर्चांमध्येही हाच विषय केंद्रस्थानी राहिला.

नांदेडमधील एका शाळेजवळच्या हॉटेलमध्ये काही शिक्षक याच विषयावर चर्चा करत होते. बहुतांश शिक्षक या घटनांमागे मोबाईलचा अतिवापर जबाबदार असल्याचे सांगत होते. काऊंटरवर बसलेला हॉटेल मालक ही चर्चा शांतपणे ऐकत होता. काही वेळाने तो शिक्षकांजवळ आला आणि म्हणाला, ''सर, प्रत्येक गोष्टीचं खापर निर्जीव मोबाईलवर फोडून प्रश्न सुटणार आहेत का? मुलांच्या हातात मोबाईल दिला कुणी? पूर्वी लग्नानंतर भलेही नवरा–बायकोचं आयुष्य राजाराणी सारखं असेल; पण मूल झालं की त्यांच्यातील 'राजाराणी'पण गळून पडायचे आणि 'आई–वडील'पण जागे व्हायचे. आज तसं किती दिसतं? अनेक पालक स्वतःच स्वतःच्या रील्स बनवण्यात आणि त्या पाहण्यात गुंतलेले असतात. मुलं त्यांचंच अनुकरण करतात. मुलं शांत राहावीत आणि आपल्या प्रायव्हेसीला बाधा नको म्हणून पालकच त्यांच्या हातात मोबाईल देतात. मग त्याचे दुष्परिणाम दिसू लागले की, दोष फक्त मोबाईलला देण्यात काय अर्थ? माझ्या मते मोबाईलपेक्षा मुलांच्या संगोपनातील पालकांची भूमिका अधिक महत्त्वाची आहे.''

हॉटेल मालकाचा मुद्दा विचार करायला लावणारा होता. मुलांना दिलेले अतिस्वातंत्र्य, अतिलाड, वेळेचा अभाव आणि संस्कारांतील कमतरता यामुळे मोठ्यांविषयीचा आदर, शिस्त आणि संयम यांसारखी मूल्ये काही प्रमाणात कमी होत चालल्याची खंत त्याच्या बोलण्यातून व्यक्त होत होती.

हॉटेल चालकाचे शालेय शिक्षण भलेही कमी–अधिक असेल, पण त्याच्या बोलण्यात व्यावहारीक ज्ञान व वैचारिक प्रगल्भता ओतप्रौत भरलेली दिसली. चर्चेच्या शेवटी तो म्हणाला, ''सर, मोबाईल हे साधन आहे; त्याचा योग्य किंवा अयोग्य वापर ठरवण्याची जबाबदारी मात्र कुटुंब, शाळा आणि समाज या तिन्ही घटकांची सामायिक आहे ना? मुलांच्या प्रत्येक चुकीसाठी केवळ तंत्रज्ञानाला दोष देण्यापेक्षा आत्मपरीक्षणाची गरज अधिक आहे.''

गत पंचवीस वर्षांपासून मी देखील शैक्षणिक क्षेत्रात प्रशिक्षक, वक्ता व समुपदेशक म्हणून कार्यरत असल्याने हॉटेल मालकाचे शब्द मलाही अंतर्मुख करून गेले. मोबाईलवर खापर फोडून आपण आपली जबाबदारी झटकत आहोत का? शाळकरी मुलाकडे धारदार शस्त्र उपलब्ध कसे झाले? या परिस्थितीची काही ना काही जबाबदारी पालक, शिक्षक व समाजाचीही आहे, हा विचार मनात घेऊन मी घराकडे निघालो.

**– शिवाजीराजे पाटील –**

## 'त्या' अनोळखी मृतदेहाची भावाने पटवली ओळख; उजव्या हातावरील गोंदणावरून निष्पन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** इतवारा पोलीस ठाण्यांतर्गत खुनाच्या गुन्ह्यातील अनोळखी मृत इसमाची ओळख पटली असून, मयत हा लोहा तालुक्यातील लोंढेसांगवी येथील मंगल शंकर गवळे असल्याचे निष्पन्न झाले आहे. ओळख पटविण्यासाठी इतवारा पोलीस उपनिरीक्षक प्रवीण आगलावे व त्यांच्या सहकार्याने शर्थीचे प्रयत्न केले. शेवटी सोशल माध्यमाचा वापर करण्यात आला आणि यातूनच अनोळखी मयताची ओळख पटली. या प्रकरणात विशेष महत्त्वाची बाजू ठरली ती घटनास्थळावरील व्हीजिटिंग कार्डची.

शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी या अनोळखी मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला होता. त्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करून पुढील ओळख पटविण्यासाठी मृतदेह शासकीय रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथील शवागृहात ठेवला होता. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी या अनोळखी मृतदेहाचे छायाचित्र व्हॉटसपच्या माध्यमातून विविध ठिकाणी पाठवले होते. ते छायाचित्र पाहून मिलिंद शंकर गवळे (वय ४९, रा. लोंढेसांगवी, ता. लोहा, जि. नांदेड) हे शवागृहात आले.

त्यांनी मृतदेहाची पाहणी केली असता मृतदेह हा त्यांचा भाऊ मंगल शंकर गवळे यांचाच असल्याची खात्री पटली. मृताच्या उजव्या हातावर त्यांची बहीण 'त्रिशला' यांचे नाव गोंदले असल्याने ओळख पटविण्यास मदत झाली. पुढील तपास इतवारा पोलीस करत आहे. सध्या या प्रकरणातील मारेकरी मात्र पोलिसांच्या तावडीत सापडले नाहीत.

## धनगर समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव; खा. रामराव वडकुते यांचा सन्मान



**नांदेड (प्रतिनिधी)** –शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे या उद्देशाने नांदेड जिल्हा धनगर समाज सत्कार समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

हा सोहळा रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी नांदेड शहरातील कुसुमताई सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमात सत्कारमूर्ती म्हणून खासदार रामराव वडकुते यांचा आयोजक मंडळासह नांदेड जिल्ह्याच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. शिवाजीराव हाके होते. प्रमुख उपस्थिती म्हणून परभणी माध्यमिक शिक्षणाधिकारी सविता बिरगे, नांदेड माध्यमिक शिक्षणाधिकारी माधवराव सलगर, उपजिल्हाधिकारी एन. एन. नवटे, आयकर विभागाचे उपसंचालक श्रीकांत मोडक, एस. जी. जी. एस. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे उपस्थित होते.

## खोबराजी गंगातीरे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – नेरली येथील महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे कार्यकर्ते खोबराजी कोंडीबा गंगातीरे यांचे रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी प्रदीर्घ आजाराने मुंबई येथे निधन झाले. मृत्यू समयी ते ५० वर्षांचे होते.

खोबराजी गंगातीरे यांच्या पार्थिवावर नेरली येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ भाऊ, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रोहिदास गंगातीरे यांचे ते लहान भाऊ होत.

## 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत आज मनपातर्फे 'तिरंगा व वंदे मातरम' प्रदर्शनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–**केंद्र आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशात ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत 'हर घर तिरंगा अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचे औचित्य साधून आणि भारतीय राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम'च्या १५० व्या गौरवशाली वर्षानिमित्त, महानगरपालिकेतर्फे सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी 'तिरंगा व वंदे मातरम छायाचित्र आणि माहिती प्रदर्शनाचे' आयोजन करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या माता गुजरीजी विसावा उद्यान येथे आयोजित या विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन आज दुपारी ३:३० वाजता महापौर कविता मुळे यांच्या हस्ते होणार असून, या कार्यक्रमास मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आणि इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम'ची निर्मिती, त्याचा इतिहास आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांना ऊर्जा देणाऱ्या या गीताचा गौरवशाली प्रवास दुर्मिळ छायाचित्रांच्या माध्यमातून मांडण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आपला राष्ट्रध्वज 'तिरंगा' सध्याच्या स्वरूपात येण्यापूर्वी त्यात काळानुरूप झालेले बदल आणि ध्वजाची उत्क्रांती दर्शविणारी माहितीपट व पोस्टर्स. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या आणि नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्याच्या मुक्ती संग्रामात योगदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या स्मृतींना या प्रदर्शनात उजाळा दिला जाणार आहे.

## निपुण महाराष्ट्र चाचणीतील गुणवत्ताधारक शाळांचा उमरीत गौरव



**उमरी (प्रतिनिधी)** – उमरी तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद शाळांचा गौरव सोहळा नुकताच येथे पार पडला. तहसील कार्यालयाच्या परिसरात असलेल्या हुतात्मा दत्तात्रय उत्तरवार सभागृहात हा गौरवाचा अभिनव सोहळा अतिशय उत्साहाच्या वातावरणात घेण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये राज्यात निपुण महाराष्ट्र अंतर्गत डिसेंबर २५ ते मार्च २६ या काळात चाचण्या घेण्यात आल्या. त्या सर्व चाचण्या निपुण महाराष्ट्र या ॲपवर मोबाईलद्वारे घेण्यात आल्या. या चाचण्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या सर्व वाचन, लेखन, संख्याज्ञान व गणिती क्रिया यावर आधारित होत्या. डिसेंबर ते मार्च या कालावधीत पार पडलेल्या चाचण्यांमध्ये गुणवत्ता धारण करून एकूण पटसंख्येच्या प्रमाणात सर्वाधिक निपुण ठरणाऱ्या टक्केवारीवर आधारित शाळांची या गौरवासाठी निवड करण्यात आली. तालुक्यातून प्राथमिक शाळा कौडगाव (प्रथम), पीएम श्री प्राथमिक शाळा सिंधी (द्वितीय) प्राथमिक शाळा जिरोना (तृतीय), प्राथमिक शाळा हुंडा उमरी पट्टी (चौथा), प्राथमिक शाळा महाटी (पाचवा), प्राथमिक शाळा करकाळा (सहावा) तर सातवा क्रमांक प्राथमिक शाळा दत्तनगर शेलगाव या शाळांनी पटकावला. १०० पेक्षा जास्त पटसंख्या असणाऱ्या शाळांपैकी प्रथम क्रमांक जिल्हा परिषद हायस्कूल हुंडागंगा पट्टी, द्वितीय क्रमांक केंद्रीय प्राथमिक शाळा बितनाळ तर तृतीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बळेगाव या शाळेने पटकावला.

दहापेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या प्राथमिक शाळा इज्जतगाव बर्डी या शाळेने ७७.७७ टक्के गुण मिळवून बहुमान मिळवला. तालुक्यातील उत्कृष्ट केंद्रांची निवड करण्यात आली. त्यात प्रथम संकुल ढोलउमरी, द्वितीय धानोरा संकुल तर गोरठा संकुलाने तृतीय क्रमांक पटकावला. प्रत्येक केंद्रातून गुणानुक्रमे तीन शाळांचाही गौरव करण्यात आला.

शिक्षक वर्गातील गुणवत्ता व त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी पंचायत समिती उमरीच्या शिक्षण विभागातर्फे या अभिनव गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com